# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १४९ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०३ श्रावण शके १९४८, शनिवार दि.२५ जुलै २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## भूलोकीचे वैकुंठ, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर: भक्तीपरंपरेचा चिरंतन स्त्रोत

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

विष्णूच्या चोवीस अवतारांपेक्षा वेगळे आणि संतांच्या भाषेत ‘चोविसांवेगळा’ म्हणून ज्याचा गौरव केला जातो, त्या ‘बापरखुमादेवीवरू’ विठ्ठलाची राजधानी म्हणजे पंढरपूर. महाराष्ट्राच्या धर्मसंस्कृतीचे मुख्य केंद्र आणि येथील भक्तीपरंपरेचे चिरंतन स्फूर्तीस्थान म्हणून या क्षेत्राकडे पाहिले जाते. अठ्ठावीस युगांपासून कटेवर हात ठेवून उभी असलेली विठोबा माऊली आणि तिचा लाडका भक्त पुंडलिक यांच्या अलौकिक नात्यामुळे या क्षेत्राला भूलोकीचे वैकुंठ असे म्हणतात. संत नामदेव महाराजांनी या स्थानाचा महिमा गाताना म्हटले आहे:

‘‘आधी रचली पंढरी। मग वैकुंठ नगरी।’’

येथील विठ्ठल मंदिरावरूनच संपूर्ण महाराष्ट्राला आणि देशाला आचार-विचारांची दिशा देणाऱ्या भागवत संप्रदायाची पताका डौलाने फडकत आहे.

भौगोलिक व नैसर्गिक महत्त्व असलेल्या चंद्रभागेच्या तीरावरील भक्तीचा महापूर पंढरपूर तीर्थस्थानी ओसंडून वाहतो. पंढरपूर हे शहर सोलापूर जिल्ह्यात भीमा नदीच्या तीरावर वसलेले आहे. परंतु, पंढरपुरातून वाहताना ही नदी विशिष्ट वळण घेते, ज्यामुळे तिचा आकार चंद्राच्या कोरीसारखा अर्धचंद्राकृती दिसतो. म्हणूनच या ठिकाणी भीमेला ‘चंद्रभागा’ या पवित्र नावाने संबोधले जाते. वारकरी संप्रदायात विठ्ठल दर्शन आणि चंद्रभागेतील स्नानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

चंद्रभागेच्या पात्रातच भक्त पुंडलिकाचे मंदिर आहे. विठ्ठल पंढरपुरात येण्याचे आणि विटेवर उभा राहण्याचे मूळ कारण पुंडलिक असल्याने, वारकरी परंपरेनुसार आधी पुंडलिकाचे आणि नंतर विठ्ठल मंदिराकडे जाण्याची प्रथा आहे. या नदीचे वाळवंट हे केवळ वाळूचा संचय नसून शतकानुशतके संतांच्या संकीर्तनाने आणि भजनाने पावन झालेले आध्यात्मिक व्यासपीठ आहे.

ऐतिहासिक, वाङ्मयीन पुरावे आणि विठ्ठलाचे मूळ:

विठ्ठल आणि पंढरपूर यांचे माहात्म्य सांगणारी प्रामुख्याने तीन स्थलपुराणे आढळतात:

स्कंदपुराण (पांडुरंगमाहात्म्य – हे हेमाद्रीपंडिताच्या व संत ज्ञानदेवांच्या उदयापूर्वीचे मानले जाते), पद्मपुराण आणि विष्णुपुराण. या पुराणांमध्ये या क्षेत्राचा उल्लेख पांडुरंगक्षेत्र, पुंडरीकक्षेत्र अथवा पौंडरीकक्षेत्र असा करण्यात आला आहे. भारतीय संस्कृती कोशाच्या पाचव्या खंडानुसार, पंढरपूरचा सर्वात पहिला स्पष्ट उल्लेख इ.स. ५१५ च्या राष्ट्रकूट राजा अविधेय याच्या ताम्रपटात ‘पांडरंगपल्ली’ पांडुरंग गाव या नावाने आढळतो.

लोकदैवतापासून ते विष्णूच्या रूपापर्यंतचा प्रवास:

ज्येष्ठ संशोधक रा. चिं. ढेरे आणि इतिहासकारांच्या मते, विठ्ठल हे मूळचे धनगर आणि गवळी समाजाचे म्हणजेच पशुपालकांचे एक आद्य लोकदैवत बीरप्पा किंवा विठोबा होते. काळाच्या ओघात भागवत संप्रदायाच्या प्रभावामुळे या लोकदैवताला विष्णूचे किंवा श्रीकृष्णाचे रूप मानले गेले.

होयसळवंशीय वीर सोमेश्वर यादव याच्या शिलालेखात कन्नड व संस्कृत अशा दोन्ही भाषांमध्ये पंढरपूरचा उल्लेख पंडरगे असा आहे. संत ज्ञानेश्वरांनी विठ्ठलाला ‘‘कानडा हो विठ्ठलु कर्नाटकू‘‘ असे संबोधून महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमधील प्राचीन सांस्कृतिक व भाषिक अनुबंधांवर प्रकाश टाकला आहे. कर्नाटकातील संत पुरंदरदास आणि कनकदास यांनीही विठ्ठलावर विपुल रचना केल्या आहेत.

शिलालेख आणि मंदिराचा जीर्णोद्धाराचा ऐतिहासिक कालपट: मंदिराची प्राचीनता सहाव्या शतकापर्यंत जात असली, तरी आजचे मंदिर हे विविध शतकांमध्ये झालेल्या बांधकामांचा आणि जीर्णोद्धाराचा परिपाक आहे.

पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराचा इतिहास हा विविध राजवटींचा आश्रय, भक्तांचे योगदान आणि अनेक स्थित्यंतरांचा एक गौरवशाली प्रवास आहे. विठ्ठल क्षेत्राचा पहिला लिखित उल्लेख इ.स. ५१५ मधील राष्ट्रकूट राजा अविधेय याच्या ताम्रपटात पांडरंगपल्ली असा आढळतो. त्यानंतर ११८९ (शके ११११)बायकांची बारी जवळील शिलालेखयादव राजे भिल्लम (पाचवे) यांच्या काळात महाजन आणि मुद्रहस्त विठ्ठलदेव नायक यांनी येथे लहान देऊळ बांधल्याची नोंद आढळते. १२३७ (शके ११५९)सोळाखांबी मंडपातील शिलालेखहोयसळ यादव वीर सोमेश्वर याने विठ्ठलाच्या अंगभोगासाठी कर्नाटकातील एक गाव दान दिल्याची नोंद. या शिलालेखाच्या ७१ व्या ओळीत याच शिलालेखात प्रसिद्ध वारीचा सर्वात प्राचीन उल्लेख सापडतो. पुढे १२७३ ते १२७७ दरम्यान यादव राजा रामचंद्रदेव आणि हेमाद्रीपंडित यांनी चौऱ्यांशीचा शिलालेख कोरून मंदिराच्या विस्ताराला मोठी गती दिली, ज्यामुळे १३०३ पर्यंत काळमंदिर बऱ्यापैकी मोठ्या व भव्य स्वरूपात उभे राहिले. १६ व्या आणि १७ व्या शतकात मुस्लिम आक्रमणांमुळे (विशेषतः अफझलखान व औरंगजेबाच्या स्वाऱ्या) मंदिराला इजा पोहोचली आणि मूर्तीचे रक्षण करण्यासाठी ती वारंवार लपवून ठेवावी लागली. या संकटांनंतर, १८०२ मध्ये शेणवी समाजातील श्रीमंत दौंडकर यांनी आजचा प्रसिद्ध दगडी सोळाखांबी मंडप उभारला, तर १८३० मध्ये भोर संस्थानाने मराठा स्थापत्यशैलीतील देखणे त्रिस्तरीय शिखर आणि सोन्याचा कळस बांधून मंदिराला आजचे वैभवशाली रूप मिळवून दिले. पंढरपूरचे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर म्हणजे केवळ एक वास्तू नसून शतकानुशतके घडत गेलेला इतिहास, समृद्ध स्थापत्यकला आणि अथांग भक्तीचा एक भव्य संगम आहे. पौराणिक कथेनुसार, भक्त पुंडलिकाच्या मातृ-पितृ भक्तीवर प्रसन्न होऊन आलेल्या परब्रन्हाला विटेवर उभे राहण्याचा मान मिळाला आणि येथूनच या क्षेत्राचे पावित्र्य सुरू झाले. ऐतिहासिकदृष्ट्या, हे मंदिर कोणत्याही एका राजाने किंवा एका वर्षात बांधलेले नाही. सुरुवातीच्या छोट्या मंदिराचे रूपांतर १२ व्या ते १३ व्या शतकात यादव राजांच्या (विशेषतः राजा कृष्णदेव आणि रामचंद्रदेव यादव) काळात एका भव्य मंदिरात झाले; ज्याची साक्ष आज आपल्याला मंदिरातील गर्भगृह आणि सोळखांबी मंडपावरील कोरीव कामातून मिळते. साधारण ३५० फूट लांब आणि १७० फूट रुंद असलेल्या या विस्तीर्ण आणि भक्कम तटबंदीच्या आवारात मुख्य विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासोबतच अनेक लहान-मोठी मंदिरे आणि सुंदर ओसऱ्या आहेत. **(क्रमशः)**

## खेळ मांडीयेला वाळवंटी घाई । नाचती वैष्णव भाई रे ।



ज्योतिर्मय साहित्य

साधुसंतांनी पंढरीच्या वारीत पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या चरणाला वंदन केले आहे. कारण ती निष्कलंक भक्तीचे प्रतीक आहे. लहान- थोर, गरीब -श्रीमंत, उच्च- नीच, लहान -मोठा हे सर्व भेद विसरून ती समानतेची वारी आहे. म्हणून येथे काला केला जातो. तो महाप्रसाद म्हणून सर्वजण त्याचा आस्वाद घेतात.त्यातून समतेचा जन्म होतो. भजन, कीर्तन, पारायण, भारुडे, ओव्या, आशीर्वचन, भूपाळ्या यातून समाज प्रबोधन केलं जाते.

पंढरीची वारी म्हणजे समतेचा श्रद्धेचा आणि भक्तीचा अखंड उत्सव होय. २१ दिवस घरदार विसरून परमेश्वराच्या सानिध्यात राहून अखंड हरिनामाचा जप करून ही पायी दिंडी चालते ज्ञानोबा -माऊली तुकाराम चा गजर वारकरी करतात आता कोठे धावे मन। तुमचे चरण देख लिया। भाग गेला शिण गेला। अवघा झाला आनंद।।म्हणून सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण होते त्यातच महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या व रांगेतून विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या एका पती-पत्नीच्या शुभहस्ते विठ्ठल रुक्मिणीची शासकीय पूजा केली जाते.

आणि हा सुख सोहळा अतिशय थाटामाटात साजरा केला जातो. प्रत्येक भाविक पंढरपुरातील सर्व देवांचे दर्शन घेऊन आनंदाने उपवास करतो. खेळ मांडीयेला वाळवंटी घाई । नाचती वैष्णव भाई रे । क्रोध अभिमान गेला पावटणी । एक एका लागतील पायी रे ।। चंद्रभागा नदीला स्नान करून वाळवंटामध्ये सर्व आपल्या गुरुबंधूं , गुरु शिष्य यांना भेटून एकमेकांचे दर्शन घेऊन प्रदक्षिणा घालून ह्या सोहळ्याचा आनंद घेतला जातो.येथे येणारा वारकरी षडरिपू पासून दूर असतो.

हे वारीचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. येथे स्वतःचं नाव चालत नाही. फक्त ज्ञानोबा- तुकोबाचा गजर चालतो. आणि प्रत्यक्ष भगवंताचं नाव माऊली माऊली माऊली याच शब्दांनी आसमंतात दुमदुमून जाते.

भूलोका वरील पंढरपूर हे गाव स्वर्गापेक्षा कमी नाही.वारकऱ्यांचा आराध्य दैवत विठ्ठल हा पंढरीचा पांडुरंग आहे.अध्यात्म भक्ती-शक्तीचे प्रतीक म्हणून पंढरपूरला ओळखले जाते.या पंढरपुरात काय वाजते गाजते । माझ्या विठूचा लग्न लागते ।। अशा ओव्या गाऊन भक्त पंढरपुरात दाखल होतात. ज्ञानोबा- तुकोबाचा गजर करीत आज संपूर्ण दिंड्या पंढरपुरात विराजमान झालेल्या आहेत. प्रत्येक वारकऱ्याचा आनंद हा गगनात मावत नाही. टाळ,वीना, मृदंग यांचा आवाज आणि आपण विठ्ठलाला भेटलो याची मनातील आस त्यांना पूर्ण करते. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले भाविक भक्त अतिशय तळमळीने विठुरायाचे दर्शन घेतात.

मानवाने आपल्या जीवनात सत्कर्म करावेत. वाईट वागू नये. प्रत्येकांना मदत करावी.वाईट चिंता, द्वेष बाजूला करावे. सर्व आपण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे.

हे सर्व शिकण्यासाठी पंढरपूर हे या पृथ्वीतला वरील स्वर्ग आहे.

स्वर्ग-नरक ह्या काल्पनिक कथा आहेत. स्वर्गात अप्सरा, रंभा, मेनका, उर्वशी असतात.असे म्हटले जाते. तिथे अमृताच्या धारा असतात. परंतु पंढरपुरात सर्व काही आहे. विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ।। म्हणून विठोबा कमरेवर हात ठेवून भक्त पुंडलिकासाठी धावून आला.

जगी प्रगटला तो जगजेठी । आला
पुंडलिकाच्या भेटी । पाहून सेवा खरी
थांबला हरी ।
तो पहा विटेवरी ।।

संत जनाबाईंनामदत केली. अनेक संतांना अडचणीमध्ये जाऊन भेटले. संत चोख्याचे गुरे राखली. म्हणून विठ्ठल हे सर्व वारकऱ्यांचे दैवत आहे. तो एक विचार आहे.

बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल,ऐकावा विठ्ठल, विठ्ठल माझा आहे, मी विठ्ठलाचा आहे. म्हणून विठ्ठल रुपी भक्त आज पंढरपुरात दाखल होऊन एकमेकांच्या पाया पडून हा आनंद सोहळा फार मोठ्या भक्तीने भावाने साजरा करीत आहेत. खरोखर माझ्या मना जी विठ्ठलाची गोडी लागली.

ती अवीट आहे. विठ्ठल आणि रुक्मिणीच्या छोट्या छोट्या प्रसंगातून जनी तुमची कोण आहे ?असे रुक्मिणी माता आपल्या पतीला विचारतात. त्यावेळेस प्रत्यक्ष विठ्ठल उत्तर देतात की,

जनी आपली लेक आहे.

असे म्हणून अखंड मानव जातीला समतेचा संदेश देतात. विठ्ठलाचा महिमा अगाध आहे. ज्यावेळेस चराचरण नव्हते, त्यावेळेस पंढरपूर हे गाव वसले होते.असे दाखले सापडतात. म्हणून पंढरी नगरी ही चंद्रभागेच्या तीरावर वसलेली आहे.ती अनेक वारकऱ्यांचं माहेर घर आहे . असं बोलले जाते. संत ज्ञानोबा -तुकोबांनी पायी दिंडी वारी काढून भक्तांना मनमोकळेपणाने आनंद घेण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. या वारीतून भक्तांना मिळालेला आनंद इतरत्र कुठेही मिळत नाही. बंधुप्रेम, आई-वडील, शेजारी-पाजारी, मित्रपरिवार, व्यावसायिक, व्यापारी या सर्वांनाच घेऊन चालणारी ही समानतेची दिंडी आहे. दिव्यांग,अपंग, मूकबधिर, मतिमंद गतिमंद सुद्धा या वारीच्या निमित्ताने घरातून बाहेर निघतात, आणि विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी आतुर झालेले असतात. म्हणून वारीही एक ऊर्जा आहे.

जसं ज्याचे कर्म आहेत.तसं त्यांना वारीत फळ मिळते.म्हणून वारकऱ्यांनी वारीच्या निमित्ताने सगळे चांगले गुण आपल्या गावाकडे घेऊन जावेत.

कोणास ही मतभेद करू नयेत. जसं आपण या वारीमध्ये वागतो. तसेच आपल्या गावाकडे सुद्धा वर्तन ठेवावे. त्यामुळे आपल्या विचाराचं सार्थक होते. सध्याची तरुण पिढी व्यसनाधीन झाली आहे. त्यांनी वारीमध्ये जाऊन वारकऱ्यांचा आदर्श घ्यावा.

अनेक बेरोजगार आम्हांला काम लागत नाही. असं म्हणतात.

त्यांनी वारीला जाऊन कोणते कोणते लोक कसे कसे काम करून पैसे जमा करतात.याची माहिती करून घ्यावी. ज्या तरुण मुला-मुलींना एक पाऊल चालून माहिती नाही, त्यांनी वारीला जाऊन तेथील चालणाऱ्या शंभर शंभर वर्षांच्या आजी-आजोबा यांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवून अनुकरण करावं, या वारीमध्ये सर्व जाती-धर्माचे लोक एकाच वाटेने जात आहेत. हे अगोदर मनात बिंबवून घ्यावं. तेव्हा या देशातील जातीयता दूर होईल. आपण समान आहोत हे आपोआप त्यांना कळेल. पंढरीची वारी ही पुस्तक वाचून करायची नसते. तर ती अनुभवातून घ्यायची असते. व्यवहार ज्ञानाचे पुस्तक बाजूला ठेवून प्रत्यक्ष कृती करून या दिंडीचा आस्वाद घेतल्यास पायी दिंडी सोहळा शेकडो वर्ष चालेल. यात थोडी सुद्धा शंका नाही. आज आषाढी एकादशीच्या निमित्ताने सर्व वारकरी, महाराज, महंत, भक्त, भाविक, व्यावसायिक, सर्व प्रशासकीय कर्मचारी, अधिकारी, माता-भगिंणी, महिला, छोटे वारकरी सेवेकरी, विणेकरी, टाळकरी, मठातील व वारकरी संस्थानातील विद्यार्थी- विद्यार्थिनी, यांना विठू माऊली प्रतिष्ठानच्या वतीने लाख लाख शुभेच्छा!




प्रा.बरसमवाड विठ्ठल गणपतराव
अध्यक्ष:विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता. मुखेड जि. नांदेड







## जात्यावरच्या ओव्या......

पंढरीचा पांडुरंग
भक्तीसी आवडे
तुझी असता संगत
मला कशाचे वावडे||७५९||

पंढरीचा पांडुरंग
गळा तुळशीची माळ
मुखी नाम तुझे घेतो
मृदंगाच्या संगे टाळ ||७६०||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५५




ज्योतिर्मय साहित्य

आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांना ऐहिक सुखाची कामना असते. सत्ता, पैसा, सोनेनाणे कितीही मिळाले तरी हवेच असते. पण भगवंताचा खरा भक्त मात्र या गोष्टींपासून दूर असतो. तो कामना करतो ती भगवंताचीच!त्याच्या मनात तळमळ असते ती भगवंतप्राप्तीचीच! त्याची समर्पण भावना एवढी तीव्र असते की स्वतः भगवंत त्याच्या ऋणात राहतो. त्यांना कोणतेही ऐहिक सुख नको असते. तुकाराम महाराज म्हणतात, '' न लगे मुक्ती आणि संपदा संत संग देई सदा.. '' त्यांचे भगवंताशी प्रेमाचे नाते जोडलेले असते. ''तूंचि बापधनी'' अशी भावना परमेश्वराबद्दल भक्ताच्या मनात असते. तोच त्यांचे आई-वडील, गुरु सगळे काही असतो.



भगवंताला देखील अशा भक्तांचा दास व्हावेसे वाटते. आपल्या दासाला कोणताही त्रास झालेला भगवंताला चालत नाही. मग जनाईला तो दळण दळू लागतो, नाथांच्या घरी तो पाणी भरतो, विठू महाराच्या रुपात दामाजींचे कर्ज फेडतो, पुंडलिकासाठी विटेवर उभा राहतो, अर्जुनासाठी त्याच्या रथाचे सारथ्य पत्करतो. यात त्याला कोणताही कमीपणा वाटत नाही.

देव बांधला जात नाही आणि त्याला कोणी बांधू शकत नाही. श्रीकृष्ण लहान असताना यशोदेने त्याला बांधण्याचा प्रयत्न केला. परंतु जो जो त्याला बांधायला जावे तो तो दोरी अपूर्ण पडत होती. मग भगवंताने स्वतःच तिच्याकडून बांधून घेतले. असा भगवंत भक्तांच्या प्रेमाने मात्र बांधला जातो. हे अदृश्य बंधन असते. देव भावाचा भुकेला असतो.

सुदामा हा श्रीकृष्णाचा मित्र होता हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. परंतु तो श्रीकृष्णाचा परमभक्त होता. तो जेव्हा श्रीकृष्णाच्या भेटीसाठी द्वारकेला आला तेव्हा श्रीकृष्णाने स्वतः त्याच्या पायात मोडलेले काटे काढले, त्याचे पाय धुतले, सेवासुश्रुषा केली. अशा रीतीने भगवंत हा भक्तांचा ऋणी होतो. परंतु त्यासाठी भक्ताची देखील तेवढी योग्यता असावी लागते.

आपले सगळे संत भगवंताचे असेच प्रेमळ भक्त होते. ''संतांचीया गावा प्रेमाचा सुकाळ, नाही तळमळ दुःख लेश '' असे उद्गार संतांच्या बाबतीत तुकाराम महाराज काढतात. म्हणूनच आपण सगळ्या संतांना माउली म्हणून संबोधतो. अशा संतांचा तर भगवंत देखील ऋणी असतो आपण अशा संतांचे दास व्हावे म्हणजे दासानुदास व्हावे. एवढी समर्पण भावना जर आपल्याजवळ असेल तर भगवंत प्राप्ती दूर नाही.

स्वसंवाद :

१) माझ्या मनातील दुराशा आणि वाईट विचार मला जाणवतात का? आणि ते नाहीसे करण्याचा मी प्रयत्न करतो का ?


२) भगवंताला प्रेमपाशात बांधण्याची तळमळ माझ्या मनात आहे का? की माझी भक्ती केवळ ऐहिक गोष्टींसाठीच आहे ?

३) ''दासानुदास'' होण्याची माझी तयारी आहे का ? संतांच्या चरणी नम्रतेने जाण्याइतकी समर्पण भावना माझ्यात आहे का ? **(क्रमशः)**



ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## मूल होऊन भगवंतापाशी जावे.



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

या जगात कर्माशिवाय कोण राहतो ? पण कर्म यथासांग होत नाही याचे कारण, आपण कर्म कशाकरिता करतो याची जाणीवच होत नाही आपल्याला. अधिष्ठानाशिवाय कर्म साधत नाही. मालक पाठीशी असला की कर्म करणाऱ्याला जोर येतो. काही चांगली कर्ममार्गी माणसे भक्तिमार्गी लोकांना नावे ठेवतात. भक्तिभावाने जो राहतो तो दुसऱ्याला नावे ठेवीत नाही. ' मी कोण ' हे जाणायला ज्ञान आणि भक्ती लागतेच; तसेच, ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' म्हटले तरी त्याचा अनुभव येण्यासाठी कर्म करावेच लागते. उपासना, भगवंताला ओळखून करावी. लहान मूल आईकडे डोळे करून मुकाट्याने दूध पिते, त्याप्रमाणे समर्थांसारख्यांनी जे सांगितले ते आम्ही निमूटपणे करावे. डोळे मिटून जितके काम होईल, अंधश्रद्धेने जे होईल, ते अभिमानाने, ज्ञानाचे डोळे उघडे ठेवूनही नाही होणार. मूल होऊन भगवंताला ओळखावे. याला अडचण एकच असते; माझे ' शहाणपण ' आड येते. भक्त मुलांसारखे वागतात, म्हणून त्यांचे लाड देव पुरवितो. कुणी असे म्हणतील की, '' भगवंताची आणि आमची ओळख नाही, तर त्याची आम्ही कशी पूजा करावी ? '' '' त्याला ओळखल्याशिवाय मी भजन करणार नाही '' हे म्हणणे वेडेपणाचेच आहे. भगवंताला पुष्कळ मार्गांनी ओळखता येईल. पांडुरंगाकडे जाण्यासाठी काही मार्ग आधी आक्रमणे जरूर आहे. संतांनी अखंड जागृत राहण्याचा मार्ग सांगितला; तो असा की, देहाने प्रपंच करा, पण मन भगवंताच्या ठिकाणी अर्पण करा. मन भगवंताच्या ठिकाणी स्थिर झाल्याशिवाय इतर काहीही करून उपयोग नाही.

ध्येय सत्य असल्याखेरीज चित्ताची स्थिरता होत नाही; पण सत्य अशा ध्येयावर अगोदर पूर्ण श्रद्धा पाहिजे. प्रपंचात जशी प्रेमाची गरज आहे तशी परमार्थात श्रद्धा पाहिजे. ' देव माझा आहे ' असे म्हणण्याऐवजी ' मी देवाचा आहे ' असे म्हणावे, म्हणजे श्रद्धा उत्पन्न होते. समुद्राचा तरंग असतो, तरंगाचा समुद्र असतो असे नव्हे. साधनात निश्चितपणा असेल तर त्यात समाधान आहे; म्हणून साधन श्रद्धेने करीत जावे. जशी श्रद्धा तशी फळे. आपण भगवंताच्या स्मरणात निर्धास्त असावे. प्रपंचात कधीच धीर सोडू नये. ज्याप्रमाणे मुंग्यांची राणी जागेवरून हलवली की तिच्यामागे असणाऱ्या हजारो मुंग्या तिच्याबरोबर नाहीशा होतात, त्याप्रमाणे एक देहबुद्धी काढून टाकली, की आपल्या मनात उठणारे हजारो संकल्प नाहीसे होतात. या देहबुद्धीच्या पलीकडे गेल्यावर जे ज्ञान होते त्यालाच आत्मज्ञान म्हणतात. असे आत्मज्ञान झाल्यावर जे पूर्ण समाधान मिळते तेच खरे भगवंताचे दर्शन होय. भक्तिमार्ग हा प्रेमाचा मार्ग आहे. प्रपंचाकडचे प्रेम भगवंताकडे वळविले की भक्ति येते.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

### वारीतील आनंद

♦ संत चोखामेळा

पुढे......

जितके प्रेम भक्ताला आपल्या प्रभू विषयी आहे, तितकेच प्रेम, तितकीच ओढ प्रभूला भक्ता विषयी आहे. या भेटीच्या ओढीतून त्या विठ्ठरायाचे सावळे रूप केव्हा एकदा पाहतो असे भक्ताला झालेले असते. जसा गाईला आपले तान्हे पाहताच पान्हा फुटतो. पण तो पान्हा या तान्ह्याला मिळायच्या ऐवजी इतरांनाच ते दूध मिळते. तसे झाले तरी हरकत नाही. माऊली ने आपल्याला जवळ घ्यावे, व आपल्या सोबत मग इतरांनाही जवळ घेतले तरी हरकत नाही, पण त्या विठू माऊलीला एकदा पाहावेच पहावे ही भावना उफाळून येते.

🚩 संत निळोबा राय

जे जे येती वारकरी भेटे हरी धावे त्या/
म्हणे माझे अंतरंग आले जिवलग
भेटीसी// करुनी प्रीतीचा सोहळा
अवलोकि डोळा क्षणक्षणा//
निळा म्हणे आवडी ऐसा/
होऊनी सारीला ठाके पुढे//

जितकी ओढ भक्ताला प्रभुची तितकीच ओढ भगवंताला भक्तांची. दमून भागून पण आनंदात धावत येणाऱ्या भक्तांना वेगाने भेट देतो. हे अनुपम सुख स्वर्गात ही पाहायला मिळणार नाही.

## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



✍ अनुभूती

अनुभूती ही "विचार, अनुभव आणि इंद्रियांद्वारे ज्ञान आणि समज प्राप्त करण्याची मानसिक क्रिया किंवा प्रक्रिया" आहे, आपल्या विचारांची अनुभूती इतरांना येत असते, म्हणून आचार विचार शुद्धच पाहिजेत.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### भारतातील टॅलेन्ट बाहेर जाऊ देऊ नका

"ए.आय."आता काय आहे, हे आता सर्वसामान्यांना लक्षात येत आहे. जवळ पास सर्व क्षेत्रात हा पसरत आहे, आणि त्याचे बरेवाईट परिणामही समोर येत आहे सर्वत्र त्यावर चर्चा, परिसंवाद,फायदेतोटे वगैरे बोलले जात आहे, एक वर्ग अजून म्हणतो की, एआय माणसाच्या मेंदूतिल काही गोष्टी कधिच करू शकत नाही! तर दुसरीकडे आपल्या भारतातील टापटॅलेन्ट परदेशात वा बाहेर जात असून भारतीय कुटुंबासाठी, सरकारसाठीही ती धोक्याची घंटा आहे. कारण जादा सॅलरी व ऑडव्हान्स्ड एआय प्रोजेक्ट मुळे देशातील टापटॅलेन्ट अमेरिकेत जाऊन स्टार्ट अपसुरू करताहेत, त्यामुळे नेसकामच्या सर्वेनुसार आपल्याकडे 2 ते 5 वर्षांनी 5/6लाख एआय प्रोफेशनलची कमी भासेल! अनेक भारतीय फाऊडंर्स नविन प्रोजेक्ट तिकडे सुरू करताहेत हे चूक आहे. मला वाटते एआय काय किंवा आयआयटी काय? मुला-मुलींनी पाठविलेले लाखो रूपये इथं आईबापाच्या बॅकेत जमा असतात, परंतु त्या पैशानी ना नात्याची ऊब विकत घेता येते ना एकटेपणा घालविता येतो! म्हणून आताच भारतीयांनी सावधान व्हावे, नाही का??

तुम्हाला काय वाटते? कुटुंब नाती यांची किंमत पैशात मोजता येत नाही, यश परत मिळवले जाते.

पण मायदेश व माया याची वर्षे परत येत नाहीत. "मी आहे ना!" पण तो मी 7/8 हजारमैल दूर एका वेगळ्या टाईम झोनमधे अडकतो म्हणून ह्या तरूण टेलेन्टला बाहेर जाऊ देऊ नका.आपणास काय वाटत?? ईथंच थांबतो. गूडडे गूड मार्निंग आपला दिवस आनंदी जावो.

## रक्तशुद्धी आणि त्वचेच्या सर्व समस्यांवर कडुनिंब आहे निसर्गाचे वरदान!



ज्योतिर्मय साहित्य

२. त्वचेचे सर्व आजार आणि इन्फेक्शन गायब...

त्वचेवर येणारे लाल फोड, सततची खाज, खरुज, नायटा किंवा उन्हाळ्यातील घामोळे यावर कडुनिंबाचे पाणी म्हणजे एक जालीम उपाय आहे. हे पाणी त्वचेवरील सर्व हानिकारक बॅक्टेरिया मारून टाकते.

३. रोगप्रतिकारशक्ती (इम्म्युनिटी) वाढते...

कडुनिंब शरीराची आतून ताकद वाढवतो. हवामान बदलल्यामुळे होणारे संसर्गजन्य आजार, सर्दी-खोकला यापासून संरक्षण मिळते.

४. पोटातील जंतू आणि मधुमेहावर नियंत्रण... कडुनिंबाची पाने पोटातील जंतू नष्ट करून पचन सुधारतात, तसेच रक्तातील साखरेची पातळी (ब्लड शुगर ) नियंत्रणात ठेवण्यासाठीही ती खूप उपयुक्त ठरतात.

कसा करावा हा उपाय (वापरण्याची अत्यंत सोपी आणि योग्य पद्धत)...

कडुनिंबाचा पुरेपूर फायदा मिळवण्यासाठी तो खालील दोन पद्धतीने वापरता येतो...

१. कोवळी पाने चावून खाणे (रक्तशुद्धीसाठी)...

सकाळी उठल्यावर उपाशीपोटी कडुनिंबाची ४-५ कोवळी (लालसर किंवा फिकट हिरव्या रंगाची) पाने घ्या. ती मिठाच्या पाण्याने स्वच्छ धुवून घ्या आणि थेट तोंडात टाकून बारीक चावून खा. पानांचा रस हळूहळू गिळा.

२. कडुनिंबाच्या पाण्याने अंघोळ (त्वचेच्या आजारांसाठी) ...

एका मोठ्या पातेल्यात पाणी घ्या आणि त्यात कडुनिंबाची १५-२० पाने टाकून ते चांगले उकळून घ्या. पाण्याचा रंग थोडा हिरवट झाल्यावर गॅस बंद करा. हे उकळलेले औषधी पाणी तुमच्या अंघोळीच्या कोमट पाण्यात मिसळा आणि या पाण्याने अंघोळ करा. साबणाचा वापर टाळल्यास अधिक उत्तम!

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

वॉर्निंग (वॉर्निंग - वापरताना घ्यायची काळजी आणि महत्त्वाची पथ्ये)...

हा पारंपरिक उपाय अतिशय सुरक्षित असला, तरी काही विशिष्ट गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे...

१. अतिसेवन पूर्णपणे टाळा... कडुनिंब प्रकृतीने उष्ण आणि अतिशय कडक असतो. त्यामुळे रोज ४-५ पानांपेक्षा जास्त पाने खाऊ नका. तसेच, सलग १५ दिवस पाने खाल्ल्यानंतर पुढचे १५ दिवस खंड (ब्रेक ) द्यावा आणि नंतर परत सुरू करावे.

२. गरोदर महिलांसाठी इशारा...

गरोदर महिलांनी (प्रेग्नन्ट वूमन) आणि स्तनपान करणाऱ्या मातांनी कडुनिंबाची पाने खाणे शक्यतो टाळावे. याच्या उष्णतेमुळे गर्भाला त्रास होऊ शकतो. (अंघोळीसाठी पाण्याचा वापर मात्र त्या करू शकतात.)

३. शुगर खूपच कमी असल्यास (लो ब्लड शुगर) कडुनिंब रक्तातील साखर वेगाने कमी करतो. त्यामुळे ज्यांची शुगर आधीच लो असते, त्यांनी पानांचे थेट सेवन करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्यावा.

***

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**मैफील गप्पांची**

खूप दिवसांनी होता
बालपणीच्या मैत्रीणींची भेट
रंगते मैफील गप्पांची
सुंदर त्या आठवणींना
मिळतो पहा उजाळा
वर्षा होते आनंदाची

जेवनानंतर नेहमीच पहा
घरोघरी रंगत असते
सुंदर मैफील गप्पांची
एकत्रीत येता सर्वजण
आनंद होतो मनी
दृष्ट नको कोणाची

# मनपा एन-सेवन सिडको शाळेत विद्यार्थ्यांना रेनकोट व शैक्षणिक साहित्य वाटप

**ज्योतिर्मय साहित्य**

महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री माननीय श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा करण्यात येत असलेल्या देवाभाऊ कृतज्ञता सप्ताह निमित्त स्थायी समिती सभापती आदरणीय श्री. अनिल भैया मकरिये साहेब व भारतीय जनता पार्टीचे छत्रपती संभाजीनगरचे प्रवक्ते आदरणीय श्री. शिरीषजी बोराळकर साहेब यांच्या शुभहस्ते शाळेतील विद्यार्थीनींना



रेनकोट आणि विद्यार्थ्यांना, विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री मनोज अग्रवाल यांनी केले. मा. श्री. अनिल भैय्या मकरीये साहेब आणि मा. श्री. शिरीषजी बोराळकर साहेब यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन श्री. सागर मगरे सरांनी केले व आभार प्रदर्शन श्री. दीपक पडोळ सरांनी केले.

कार्यक्रम कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक शिक्षिका मा. सौ. संगीता अंबेकर, मा. श्रीमती सुनीता पाटील, मा. श्रीमती वैशाली सुरडकर, मा. श्रीमती मंगला महाजन, मा. श्रीमती अंजली कुलकर्णी, मा. श्रीमती स्वाती घोडतुरे, मा. श्रीमती दीपाली औटे, मा. श्रीमती शिल्पा बहुरे, मा. श्रीमती वैशाली देशमुख, मा. श्रीमती मंजुश्री राठोड, मा. श्री. वेंकट जाधव,मा. श्रीमती शुभांगी चव्हाण,मा. श्री. संदिप कळंबे, मा. श्री.ज्ञानेश्वर असोलकर,मा. श्रीमती पल्लवी क्षीरसागर, मा. श्री. प्रितीश सराटे, मा.मा. श्री. सुशील दांडगे, मा. श्रीमती फिरदोस नदाफ, मा. श्रीमती सबासदफ सिद्दीकी, मा. श्रीमती पल्लवी क्षीरसागर, मा. श्रीमती बोरसे, मा. श्रीमती सदावर्ते, मा. श्रीमती अंकिता बोचरे, मा. श्रीमती आश्विनी घोडके, मा. श्री. निशांत जडे या सर्व शिक्षक शिक्षिकांनी आणि मा. श्री. रमेश देवडे, मा. श्री. विजय गायकवाड, मा. श्री अविनाश भोंबे या सेवकांनी सक्रियपणे सहभाग घेतला.

# कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे विठ्ठल-रुक्मिणी वारकरी रूप स्पर्धाला प्रचंड प्रतिसाद !

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : आषाढी एकादशी निमित्त पूर्व संध्याकाळी कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे कुलस्वामिनी मंगल कार्यालयात विठ्ठल रुक्मिणी वारकरी रूप स्पर्धा घेण्यात आली. आठ फुटी भव्य उंच विठ्ठल मूर्ती सजावट जवळपास १८ बाइ ३२ फुटी स्टेज वर साकारण्यात आली होती. या उपक्रमास जवळपास ७० स्पर्धकांनी पारंपारिक व शिस्तीने पेहराव करून भाग घेतला. सर्वात चिमुरडी चार महिन्याची हिने रंगत आणली ती रांगत विठ्ठलासमोर रैंप वॉक करत !

विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे-

गट - १ महिना ते ५ वर्ष - ५ ते १० वर्ष , नारायणी टाकळकर,श्रीवस्त गोसावी,हर्षदा लोखंडे, देवश्री राजहंस, ओजस्वी गवारे,स्वरा गोजरे. राजे वैदही, नभा राजे, अनघा चव्हाण, जहान अरोरा, शांभवी शेवतेकर, दर्शना घोडकी, स्वर्णिका व नभा राजे, अद्विक अस्वलीकर, कस्तुरी गोसावी, आराध्या कुलकर्णी. हा उपक्रम प्रतिष्ठानचे सौ अलका व विलास कोरडे व अविराज कोरडे यांचे मार्फत घेण्यात आला. परीक्षक म्हणुन साई महाशब्दे यांनी काम पाहिले, कार्यक्रमाचे अँकरिंग भावना कुटे यांनी केले. यावेळी माधुरी अदवंत, रमा नावंदर, शीतल राजपूत, सना शेख, संजय राठोड यांची प्रमुख उपस्थिती



होती. कार्यक्रम यशस्वी होणेसाठी प्रल्हाद राठोड, कुलकर्णी मामा, अनिल गावंडे, नरवडे नथुराव, भावना सोनी यांनी मेहनत घेतली. शेवटी सर्व छोट्या विठ्ठल रुक्मिणी वारकरी यांनी विठ्ठल मूर्ती वर पुष्प वर्षाव केला.



# राजीव गांधी महाविद्यालय करमाड येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती निमित्त विशेष व्याख्यान संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

करमाड - राजीव गांधी महाविद्यालय करमाड येथे इतिहास विभागाच्या वतीने लोकमान्य टिळक यांच्या जयंती प्रसंगी विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे हे अध्यक्षस्थानी होते. मान्यवरांच्या हस्ते लोकमान्यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. प्रा. डॉ. अतुल मोरे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. भारतीय स्वातंत्र्य आंदोलन व लोकमान्य टिळक या विषयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करताना डॉ.मोरे यांनी टिळकांनी सार्वजनिक गणेश उत्सव, शिवजयंती, मराठा केसरी सारखी वृत्तपत्रे इत्यादीच्या माध्यमातून जनतेला एकत्र आणून ब्रिटिश प्रशासनाविरुद्धच्या विविध आंदोलनात सहभागी करून घेतले. टिळकांच्या कार्यावर प्रकाश टाकताना त्यांनी टिळकांना झालेली ६वर्षाची शिक्षा,होमरूल चळवळ ,लखनऊ करार याचे सविस्तर विश्लेषण करून भविष्यात महात्मा गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या विविध आंदोलनाची पायाभरणी केली असे म्हटले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य मुळे सरांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य तथा विभाग प्रमुख प्रा. मनोज देवकर यांनी केले तर आभार डॉ. योगेश शिंदे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. बी. बी. लिहिणार, डॉ. चिंचोलकर, डॉ. डहाळे, डॉ.दांडगे डॉ. फड, डॉ. कचरे, डॉ. लावंड, डॉ. पोटदुखे, डॉ. गोल्डे ,डॉ. जयश्री पाटील , अलका कुलकर्णी, डॉ.अमित राऊत, डॉ.सौरभ चव्हाण प्रसन्न वैद्य इ. तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मराठी भाषा संवर्धनासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : मराठी भाषेच्या संवर्धनासाठी जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना सक्षम करण्यासोबतच ग्रंथालयांच्या मान्यता व वर्गबदलाच्या प्रलंबित प्रश्नांवर शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात मराठी भाषेसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी श्री. गुलाबराव मगर व साईनाथ जाधव यांनी डॉ. सामंत यांना ग्रंथभेट देऊन स्वागत केले.

बैठकीदरम्यान ग्रंथालयांच्या प्रश्नांवर चर्चा झाली. २०१२ पासून प्रलंबित असलेल्या ग्रंथालय मान्यता आणि वर्गबदलाच्या प्रश्नांकडे उपस्थितांनी मंत्र्यांचे लक्ष वेधले. याबाबतची सविस्तर माहिती असल्याचे सांगत डॉ. सामंत यांनी, सार्वजनिक ग्रंथालये अधिक सक्षम होणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले.

या प्रश्नांसाठी शिष्टमंडळासह मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची भेट घेऊन मागणी पुढे नेण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन डॉ. सामंत यांनी दिले.

# मोहितेमळा शाळेत दिंडी सोहळ्यातून जनजागृती

**ज्योतिर्मय साहित्य**

**सातारा** - जिल्हा परिषद शाळा मोहिते मळा येथे दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला. होता. या दिंडी सोहळ्यामध्ये लहान थोर सर्वजण सहभागी झाले होते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा सौ.अमृता मोहिते यांच्या हस्ते दिंडी सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. या दिंडी सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे मुलांनी नव साक्षरता अभियान याविषयी जनजागृती केली. त्याचबरोबर वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन, जलसंधारण, लेक वाचवा अभियान, याची जनजागृती केली. मुलांनी स्वतः तयार केलेले बीजगोळे दिंडीत जाणाऱ्या वारकऱ्यांच्या



हाती सुपूर्द केले. पायी चालणाऱ्या वारकऱ्यांनी वाटेत जाता जाता ते पुरावेत हा त्यामागचा उद्देश होता. श्री. किसनराव मोहिते यांनी मुलांसाठी खाऊ दिला. शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाराम गायकवाड यांनी जलसंधारण व वृक्ष लागवड याविषयी मार्गदर्शन केले व उपशिक्षिका रंजना सानप मॅडम यांनी असाक्षरांची नोंदणी व साक्षरतेचे महत्त्व पटवून दिले. खूप उत्साहाच्या वातावरणामध्ये दिंडी सोहळा पार पडला. श्री राजाराम गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत केले व रंजना सानप मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले.






# विठ्ठल भेटला की स्वत:चाही शोध लागतो

**अमोल बोरीकर 86240 03013**

विठ्ठल' हे केवळ दोन अक्षरी नाम नाही, तर ती मानवी अंतःकरणाची एक अशी अवस्था आहे, जिथे पोहोचल्यावर माणसाचे अस्तित्वच बदलून जाते. आपण वर्षानुवर्षे संसाराच्या या जंजाळात स्वतःला शोधत असतो. "मी कोण?", "माझे काय?", "माझे अस्तित्व काय?" या प्रश्नांच्या चक्रव्यूहात अडकून माणूस स्वतःची खरी ओळखच हरवून बसतो. पण ज्या क्षणी या जिवाची त्या सावळ्या परब्रह्माशी, म्हणजेच विठ्ठलाशी खरी भेट होते, त्याच क्षणी अज्ञानाचा अंधार दूर होतो आणि माणसाला स्वतःचाही खरा शोध लागतो.

पंढरपूरच्या मंदिरात दर्शनासाठी तासन्तास रांगेत उभा असलेला वारकरी, जेव्हा त्या सावळ्या विठ्ठलासमोर येतो, तेव्हा काही क्षणांसाठी काळ थांबतो. हात जोडलेले असतात, पण शब्द हरवलेले असतात. डोळ्यांतून वाहणारे अश्रूच त्याची प्रार्थना बनतात. त्या क्षणी तो देवाला काही मागत नाही... कारण त्याला जाणवतं— ज्याला मी शोधत होतो, तो तर माझ्या अंतःकरणातच होता.

संत ज्ञानेश्वर म्हणतात, "अवघाची संसार सुखाचा करीन." हा संदेश केवळ समाजासाठी नव्हता; तो प्रत्येकाच्या मनासाठी होता. तुकाराम यांनीही विठ्ठलाला बाहेर नव्हे, तर आपल्या श्वासात अनुभवला. म्हणूनच संतांची भक्ती ही देव शोधण्याची नव्हती; स्वतःला ओळखण्याची होती.

आपण आयुष्यभर स्वतःला अनेक नावांनी ओळखतो— कोणी वडील, कोणी मुलगा, कोणी आई, कोणी अधिकारी, कोणी व्यापारी. पण या सगळ्या ओळखींच्या मागे असलेला "मी" कोण, हा प्रश्न विचारायलाच आपण विसरतो. वारी हा प्रश्न विचारायला शिकवते.

विठ्ठल भेटतो तेव्हा मनातील अहंकार वितळतो. दुसऱ्याच्या यशाचा मत्सर संपतो. क्षमा सहज होते. आई-वडिलांच्या त्यागाची जाणीव होते. नाती जपण्याची ओढ निर्माण होते. आणि तेव्हाच जाणवतं—मी बदललो आहे.

हीच विठ्ठलाची कृपा आहे.

विठ्ठल मूर्तीमध्ये दिसणं हा चमत्कार नाही; विठ्ठल भेटल्यानंतर आपल्या स्वभावात प्रेम वाढणं, राग कमी होणं, सेवा सहज होणं आणि प्रत्येक माणसात देव दिसू लागणं—हाच खरा चमत्कार आहे.

आपणची आपणास पाहावे।
विठ्ठलरूप होऊन राहावे।।"

संतांनी नेहमीच सांगितले आहे की, देव आणि भक्त यांच्यात कोणतेही अंतर नाही. जोपर्यंत आपण विठ्ठलाला स्वतःपासून वेगळे मानतो, तोपर्यंत तो भेटत नाही.

विठ्ठलाच्या या भेटीनंतर गळ्यात पडलेली तुळशीमाळ फक्त लाकडाचे मणी राहत नाही, ती काळजाची स्पंदने बनते. मग वाटेत भेटणारा प्रत्येक दुःखी माणूस आपला वाटू लागतो. कोणाच्या डोळ्यांतले पाणी पुसताना, कोणा थकलेल्या जीवाला आधार देताना, आतून एकच आवाज येतो—"हा तर माझाच विठ्ठल आहे!"

हा स्वतःचा शोध म्हणजेच विठ्ठलाची खरी भेट. जेव्हा डोळ्यांतले विरहाचे अश्रू तृप्तीच्या आनंदाश्रूंमध्ये बदलतात, जेव्हा 'मी'पणाचा अंत होतो आणि श्वासागणिक फक्त विठ्ठलनामाचा निनाद उरतो, तेव्हा समजावे की या जीवाला त्याचा मूळ ठाव सापडला आहे. मग पंढरी लांब राहत नाही, चंद्रभागा बाहेर वाहात नाही... माणूस स्वतःच एक वाहती भक्तीगंगा बनतो!

विठ्ठल भेटला म्हणजे देव भेटला, एवढंच खरं नाही. विठ्ठल भेटला म्हणजे मनात दडलेला खरा "मी" भेटला. जो प्रेम करू शकतो, क्षमा करू शकतो, सेवा करू शकतो आणि प्रत्येक जीवात परमेश्वर पाहू शकतो. ज्या दिवशी विठ्ठलाच्या दर्शनानंतर आपण आरशात स्वतःकडे पाहून म्हणू—"आज मी कालपेक्षा अधिक माणूस झालो आहे," त्या दिवशी समजावं, विठ्ठलाचं दर्शन पूर्ण झालं. कारण विठ्ठलाचा खरा चमत्कार मंदिरात घडत नाही... तो माणसाच्या अंतःकरणात घडतो. आणि त्या क्षणी देव सापडतोच, पण स्वतःचाही शोध लागतो.

# ओळख साहित्यिकांची



## मोहिनी किंहीकर हेडावू

- शिक्षण : एम ए.
पीएचडी चे काम सुरू
- सध्या नागपूर मध्ये सहायक राज्यकर आयुक्त (Assistant Commissioner of State Taxes) .. GST Department
- स्पर्धा परीक्षा तयारीच्या परीक्षा कार्यशाळा घेतल्या,
- वाचनाची, लिखाणाची आवड. ललित लेखन, कविता तसेच सामाजिक विषयावर लिखाण करायला आवडते. लोकप्रभा, तरुण भारत, देशोन्नती, मातृ सत्ता व जन्मंगळ ज्योतिर्मय साहित्य मधून लेख प्रकाशित झाले.
- मनमोर या नावाचे ललित सदर जनमंगल या साप्ताहिकातून वर्षभर चालविले.
- जनमगल साप्ताहिकाच्या वाचन प्रेरणा दिनविशेषांक तसेच महिला दिन विशेषांकाचे अतिथी संपादन केले.
- नुकतच "मनातलं" हा ललित लेखांचा संग्रह प्रकाशित. 'स्वांत सुखाय' हा दुसरा ललित लेख संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर
- समाज कार्याची आवड, एका अनाथाश्रमाशी जोडून येथील विद्यार्थ्यांसाठी अन्नधान्य तसेच पुस्तकांसाठी देणगी जमून घेण्याचे काम करते.

## सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

# वारी... आनंदाची, भक्तीची आणि माणुसकीची

ज्योतिर्मय साहित्य



''ज्ञानोबा... तुकाराम!'' हा जयघोष कानावर पडला की नकळत पाय ताल धरू लागतात. टाळ-मृदंगाचा नाद, डोक्यावर तुळशीची कुंडी, खांद्यावर पताका, चेहऱ्यावर समाधान आणि ओठांवर विठ्ठलाचे नाव... एवढे चित्र डोळ्यांसमोर आले की समजावे, वारी निघाली आहे.

महाराष्ट्राच्या संस्कृतीत अनेक सण-उत्सव आहेत, पण वारीचे स्थान वेगळेच आहे. ही केवळ पंढरपूरची यात्रा नाही; ती माणसाला माणसाशी जोडणारी, आनंद देणारी आणि मन प्रसन्न करणारी वाटचाल आहे.

पाऊल पाऊल नाम घेऊ,
विठ्ठल भेटीची आस;
चालता चालता कळून जाते,
भक्तीत दडलेला खास सुवास

वारी म्हटली की आठवतात दिंड्या, अभंग, फुगड्या, भारुडे आणि गप्पांचा फड. रस्त्यावर चालताना कोणी कोणाला ओळखत नसते, पण दोन क्षणांत सारे ''माऊली'' होऊन जातात. एका बाटलीतील पाणी चार जण पितात, एका झाडाच्या सावलीत दहा जण विसावतात आणि एका अभंगावर शंभर जण एकाच तालात डोलतात.

वारीत चालताना कुणी श्रीमंत असतो, कुणी गरीब; कुणी डॉक्टर, कुणी शेतकरी, कुणी शिक्षक तर कुणी मजूर. पण विठ्ठलाच्या वाटेवर सर्वांची ओळख एकच ''वारकरी''.

✍ प्रिया नेवे (निवृत्त शिक्षिका)
पिंपळे सौदागर, पुणे.
9422134732.



ना श्रीमंती, ना गरिबी,
ना जातीचा भेद;
विठ्ठलाच्या दारी सारे,
प्रेमाने होतात एकवटलेले वेध.

आषाढी एकादशी हा या सोहळ्याचा कळस असतो. लाखो भाविक चंद्रभागेच्या तीरावर एकत्र येतात. विठ्ठलाच्या दर्शनासाठी रांगेत उभे राहतानाही चेहऱ्यावर थकवा नसतो; उलट समाधानाची गोड स्मितरेषा असते. कितीही वेळ लागला तरी तक्रार नसते, कारण मनात एकच भावना ''आता विठूराय भेटणार!''

वारीचा आणखी एक सुंदर पैलू म्हणजे तिचे साधेपण. वाटेत कुठे भजन सुरू असते, कुठे कीर्तन, तर कुठे एखादा वारकरी एखादा अभंग म्हणत साऱ्यांचे लक्ष वेधून घेतो. काही ठिकाणी गरम चहाचा कप मिळतो, तर कुठे प्रेमाने दिलेली खिचडीही पंचपक्वान्नासारखी लागते.

लहानपणी अनेकांनी पालखी पाहण्यासाठी गावाच्या वेशीवर धाव घेतली असेल. पताका दिसल्या की आनंद व्हायचा. टाळांचा आवाज जवळ आला की घराबाहेर सगळे जमायचे. वारकऱ्यांना पाणी देण्यात, ताक वाटण्यात किंवा फक्त नमस्कार करण्यातही एक वेगळे समाधान मिळायचे. त्या आठवणी आजही मनात ताज्या आहेत.

वारी आली गावामध्ये,
दारासमोर आनंद;
''ज्ञानोबा-तुकाराम'' म्हणताच,
फुलून जाते मन.

आजच्या धावपळीच्या जीवनात वारी आपल्याला एक छोटासा धडा शिकवते थोडं चालावं, थोडं हसावं, थोडं गाऊन घ्यावं आणि भरभरून माणसं जोडावीत. एवढं केलं तरी जीवनाची वाट अधिक सुंदर होते.

आषाढी एकादशी हा केवळ उपवासाचा दिवस नाही; तो मनातील कटुता कमी करून प्रेम, मैत्री आणि आपुलकी वाढवण्याचा दिवस आहे. विठ्ठलाच्या दर्शनाइतकेच महत्त्वाचे आहे माणसांमधील नात्यांचे दर्शन.

आज वारीत तरुणही मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहेत. मोबाईलच्या युगातही अभंगांचा नाद तितकाच गोड वाटतो, हेच या परंपरेचे मोठेपण आहे. परंपरा बदलत्या काळानुसार नवे रूप घेत असली, तरी तिचा आत्मा मात्र तोच आहे. लेखाचा शेवट एका छोट्याशा चारोळीने करूया

टाळ-मृदंग, अभंग गोड,
विठ्ठलनामाचा साज;
वारी म्हणजे आनंदयात्रा,
प्रत्येकाच्या मनाचा राज!

आषाढी एकादशीच्या निमित्ताने सर्वांच्या आयुष्यात आनंद, समाधान आणि निरोगी आरोग्य नांदो. विठ्ठलाच्या कृपेने प्रत्येक दिवस हा उत्सवासारखा आनंदी जावो, हीच मंगलकामना!!

# वारीची परंपरा

ज्योतिर्मय साहित्य

आयुष्याला देई
नवीन उभारी
विठू माऊलीची
पंढरीची वारी

अशा प्रकारे जिचे वर्णन करता येईल तीच भोळ्या वारकऱ्यांची पंढरीची वारी !एक/दोन नव्हे जवळपास ८००वर्षाहून मोठी परंपरा असलेली वारी.संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत वारीला पंढरीला जात होते म्हणजेच त्याअगोदरच्या काळापासून ही वारीची परंपरा महाराष्ट्रात सुरू होती.पुढील काळात संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम,संत नामदेव,संत चोखामेळा,संत एकनाथ यासारख्या अनेक संतांनी ही परंपरा राखली.घरदार सोडून व देहभान विसरून, हालअपेष्टा सहन करत ऊन,वारा,थंडी,पाऊस अंगावर झेलत आणि ग्यानबा तुकाराम व विठू माऊलीचा गजर करत कित्येक मैल पायी चालत जाणाऱ्यांची असते पंढरीची वारी ! पूर्वीच्या काळी फारशी दळणवळणाची साधने व रस्ते नसायचे म्हणून पायी पायी चालत जाण्याची पद्धत पडली.

आषाढ महिना सुरू होताच सर्वांना आवर्जून एक आठवण होते ती म्हणजे आषाढी एकादशीची. विठू माऊलीचे दर्शन करण्यासाठी आपल्या गावापासून चालत जाऊन एकादशीलाच सावळ्या विठ्ठलाचे दर्शन घडावे हे एकमेव स्वप्न उराशी बाळगत वारकरी निघतात. महाराष्ट्र तसेच आजुबाजूच्या राज्यातील असलेल्या लहान मोठ्या गावातील सर्व



वयोगटातील स्त्रिया,पुरुष वारीमध्ये दरवर्षी नित्यनेमाने येतात.

आकाशात पतितं तोयं
यथा गच्छति सागरं ।
सर्व देवं नमस्कार:
केशवं प्रति गच्छती ।।

आकाशातून पडलेले पाणी सागराला जसे मिळते तसे सर्व देवाला केलेला नमस्कार केशव म्हणजे श्रीकृष्णाला प्राप्त होतो.अगदी त्याचप्रमाणे निरनिराळ्या ठिकाणावरून आलेल्या दिंड्या व पालख्या घेऊन वारकरी पंढरपूरला येतात व पांडुरंगाचे दर्शन घेतात.पांडुरंग हे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत.

भक्त पुंडलिकाने भिरकावलेल्या विटेवर अठ्ठावीस युगे उभा पांडुरंग तीच विठू माऊली.तिचे वर्णन करण्यास शब्द कमी पडतात.विठू माऊली आपल्या भक्तांना नामाची ओढ लावते.त्यामुळेच चंद्रभागा नदीच्या तीरावर स्नान करून दर्शन बारीत तासनतास ते उभे राहतात. सावळ्या विठ्ठला तुझे रूप सुंदर,गोजिरे, मनोहर, तूच भक्तांचा प्रतिपालक. पाहता क्षणी भान हरपते.जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते.अशी विठू माऊली पाहून वारकरी म्हणतो,''तव रूप पाहणे सुख हे''!

अरविंद कुळकर्णी
(सेवानिवृत्त गणित शिक्षक)
भ्रमण. - ९८२२६४२२९४



या पुण्यपर्वावर परंपरेनुसार महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री विठ्ठल रुख्मिणीला अभिषेक,वस्त्रालंकार, नैवैद्य,आरती करून शासकीय महापूजा करतात.पंढरीचा वारी सोहळा हा केवळ सांगण्याचा विषय नसून प्रत्यक्ष अनुभूतीचा क्षण असतो. प्रत्येकाला मनातून असे वाटत असते की आपणही एकवेळ या वारीत सहभागी व्हावे.संसाराच्या सर्व ताण तणावातून मुक्तता,घरदार,पैसा अडका या मोहातून बाहेर यावे,निस्वार्थी वृत्तीने सर्व भेदभाव विसरून सर्वांच्या सोबत चालत राहावे,आध्यात्मिक मार्गाचा अनुभव घ्यावा. या वारीची अनेक वैशिष्ट्ये आहेत.नाचत गात व टाळ, वीणा,मृदुंग अशी वाद्ये वाजवत भजन,कीर्तन करत वारीचा आनंद लुटत दिवसाची रात्र अन् रात्रीचा दिवस कसा होतो हे कळतही नाही.वाटेत अनेक चांगले वाईट अनुभव येत असतात.गावोगाव येणाऱ्या वारकऱ्यांनाही दिंडीत सहभागी करून घेतात.दिंडी चालली पंढरी,जय जय विठ्ठल विठ्ठल हरी ! यासारखी गाणे गाऊन दिंडीचा उत्साह संचारतो. गायन,वादन,कीर्तन, प्रवचन,संभाषण,नेतृत्वगुण, व्यवस्थापन,वेळेचे नियोजन, एकमेकांना सहकार्य अशा कलागुणांना संधी मिळते. गावचे भाविक भक्त दिंडीच्या आगमना बरोबर त्यांच्या व्यवस्थेसाठी सज्ज राहतात.वारकरी सुध्दा नियम पाळतात. कुणाच्या घरी वैयक्तिक मुक्काम करायचा नसतो.कळत नकळत आपल्या आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरा जोपासण्याचे महान कार्य वारकरी करत असतात हे विसरून चालणार नाही. पुंडलिक वरदा हरी विठ्ठल व जय जय रामकृष्ण हरी अशा जयघोषाने पंढरपूरचा परिसर निनादून जातो.वेगवेगळे खेळ,रिंगण याचाही आनंद घ्यायचा असतो.अशा या पंढरपूर वारीत आपण सहभागी होऊया.जमल्यास प्रत्यक्ष न जमल्यास घरच्या घरी राहूनही आषाढी एकादशीला आपल्या संपन्न महाराष्ट्रासाठी विठूरायाकडे प्रार्थना करुया.जय हरी विठ्ठल!

# हेची दान देगा देवा तुझा विसर न व्हावा...!

ज्योतिर्मय साहित्य

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत आपल्या सर्वांची विठू माऊली... अख्या महाराष्ट्रातून... आषाढी एकादशी निमित्त... माऊलींच्या दर्शनासाठी... प्रत्येक घरातून, गावातून... अनेक विठ्ठल भक्त, वारकरी... डोंगर, घाट, ऊन, वारा पाऊस .. याच भान विसरून... स्वतः च देहभान हरपून.. टाळ मृदंगाच्या गजरात.... अखंड वारी चालत आहेत.

वारी अशीच चालत आली आहे. आणि ती अखंड चालत राहणार आहे.. माऊलींनी मात्र आपल्या वारीच्या



निमित्ताने... माणसातल माणूस पण.. जागे ठेवण्यासाठी जात पात, धर्म.. हा भेदभाव विसरून तु चालत रहा... मी तुझ्यातच आहे. तुझ्या प्रत्येक कर्मात आहे. याची तुला जाणीव होत रहावी. म्हणूनच मी उभा आहे. विटेवरी कर ठेवूनिया कटावरी

तु माझ्यापर्यंत येताना... कुणाला मदत केलीस, तुझे वाणी, विचार कसे होते. तु कुणाचा द्वेष, मत्सर, केला नाहीस, तुझा आत्मा सात्विक होता. तुला या संसारातील प्रत्येक गोष्टीत माझं.. अस्तिव जाणवत होतं.

आज आषाढी एकादशी.. तु मला आणि मी तुला भेटलो... अवघी पंढरी भक्ति रसात न्हावून निघाली...

चंद्रभागेत...पवित्र स्नान केलसं तिनं तुला अंतरंगात डोकावून पाहण्याची संधी दिली... तिथून पुंडलिकाचे दर्शन घेतलंस... जन्मदात्याची सेवा करण्यास कुठेही कमी पडू नकोस.. तिथं च तुझी खरी विठ्ठल रखुमाई आहे.... याचं तुला ज्ञान व्हावं... या संसारभवसागरातून.... मुक्त होवून तु माझ्याकडे यावं.... म्हणूनच ही वारी.......

मी वाट बघत उभा आहे विटेवरी..!

सौ. प्रज्ञा शिंदे
(मो) ९५६१७८९६४५

# आषाढी एकादशी (देव शयनी एकादशी)

ज्योतिर्मय साहित्य

आषाढी एकादशी किंवा देवशयनी एकादशी ही हिंदू पंचांगातील एक तिथी आहे. वारकरी संप्रदायाचा हा सर्वात मोठा उत्सव असतो. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षात येणाऱ्या एकादशीला, देवशयनी एकादशी असे म्हणतात.

हिंदू पंचांगाप्रमाणे प्रत्येक महिन्यात दोन पंधर वाडे असतात. त्यामुळे दर महिन्याला एक तिथी, दोन वेळेस येते. एक शुद्ध तिथी व दुसरी वद्य तिथी. म्हणून आषाढ महिन्यात ही एकादशी ही तिथी दोनदा येते. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला देव शयनी एकादशी म्हणतात तर,आषाढ वद्य एकादशीला कामिका एकादशी म्हणतात.

प्रत्येक चंद्र मासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील अकराव्या तिथीला एकादशी म्हणतात. चांद्र मास गणने तील फरकामुळे तिथिची वृद्धी झाल्यास, स्मार्त आणि भागवत एकादशी असे दोन भेद सांगितलेले आहेत. ज्या पक्षात हे दोन भेद येतात त्यावेळी पंचांगात पहिल्या दिवशी स्मार्त व दुसऱ्या दिवशी भागवत असे लिहिलेले असते. यातही स्मार्त एकादशीला नाव असते, पण भागवत एकादशीला नाव नसते.अधिक मास असल्यास आणखी दोन एकादशी येतात. या दोन्हीही एकादशीना *कमला* एकादशी हेच नाव असते.

देव शयनी एकादशी असे का म्हणतात?

धार्मिक मान्यतेनुसार मनुष्याचे एक वर्ष हे देवाची एक अहोरात्र असते. आषाढ महिन्यातील कर्क संक्रांतीला उत्तरायण पूर्ण होते, आणि दक्षिणायन सुरू होते. म्हणून या एकादशीला देवशयनी एकादशी म्हणतात.

एकादशीचे दिवशी उपवास करावा असे धर्मशास्त्रात सांगितलेले आहे.

आपण बहुतेक जण उपवास असला म्हणजे, त्या दिवशी केवळ भोजनासाठीचे पदार्थ बदलून वापरतो. पण जेवणात अन्नाची मात्रा कमी करीत नाहीत. याऐवजी शक्यतो पूर्ण उपवास करून राहावे, किंवा फलाहार किंवा अल्प आहार घ्यावा असे आहे.

अध्यात्मात उपवास याचा अर्थ मात्र वेगळा आहे. तो असा.

''उपवास'' = ''उप'' + ''वास''

उप = जवळ, वास = राहणे

म्हणजेच ईश्वराच्या, आत्म स्वरूपाच्या किंवा सत्याच्या जवळ राहणे, हा उपवासाचा मूळ अर्थ आहे. केवळ अन्नाचा त्याग करणे म्हणजे पूर्ण उपवास नव्हे.

धर्म ग्रंथांमध्ये असे म्हटले आहे:

उपावृत्तस्य पापेभ्यो यस्तु वासो गुणैः सह ।
उपवासः स विज्ञेयः न शरीरविशोषणम् ।।

अर्थ: ''पापांपासून दूर राहून सद्गुणा सह जो वास करतो, त्यालाच उपवास म्हणतात; केवळ शरीराला कृश करणे म्हणजे उपवास नव्हे.''

एकादशी या दिवशी उपवास करणे याचा खरा अर्थ पाच ज्ञानेन्द्रिय अधिक पाच कर्मेंद्रिये व



अकरावे मन या सर्वांना पूर्ण दिवसभर भगवंताचे चिंतनात ठेवणे हा उपवासाचा खरा अर्थ आहे.

उपवास कसा करावा?

वर दिल्याप्रमाणे उपवास करणे तर किती कठीण आहे हे आपण जाणले. निदान आपण ज्याला उपवास समजतो तो तरी कसा करावा? ते आपण आता पाहू.

दशमीचे दिवशी केवळ मध्यानीचे भोजन करावे व संध्याकाळी काहीही खाऊ नये एकादशीचे दिवशी संपूर्ण दिवसभर निराहार राहावे द्वादशीचे दिवशी सकाळी स्नान,पूजा होताच पारणे फेडावे पण संध्याकाळी काहीही खाऊ नये. असा एकूण तीन दिवसाचा नियमबद्ध कार्यक्रम सुचविला आहे.

भविष्य पुराणातील एकादशी व्रताची महती

एकादशी व्रत केल्याने संपूर्ण पाप नष्ट होते द्वादशी ही बारा प्रकारच्या पापाचे हरण करते.

देवशयनी एकादशी बद्दल भविष्य पुराणात या व्रताचा विधी सांगितला आहे.

व्रत विधी

या दिवशी भगवंताच्या मूर्तीला दूध,दही, मध तूप व जलाने स्नान घालावे. त्यानंतर गंध धूप, कुमकुम व वस्त्र अर्पण करावे.

यावेळी करायची प्रार्थना

सुप्ते त्वयी जगन्नाथ जगत सुप्तं भवेदिदम्/ विबुद्धे त्वयी बुद्धेत जगत सर्व चराचरमे//

(उत्तर पर्व ७०/१०)

(हे प्रभू आपण शयन केल्यावर सर्वजण सुप्त होते व आपण जागे झाल्यावर संपूर्ण चराचर जगत सचेत होते).

आपले सण, आपले उत्सव
मधुकर बोरीकर, पुणे
9403061886

यानंतर भगवंताच्या विग्रहाला पांढऱ्या शुभ्र गादीवर शयनावस्थेत ठेवतात यावेळी स्वतःच्या वाणीवर नियंत्रण ठेवण्याची प्रतिज्ञा घेतात. तसेच या निमित्याने पुढच्या चार महिन्यात (याला चातुर्मास असे म्हणतात) यात किमान एखादी प्रिय वस्तूचा त्याग करावा.

चातुर्मासात कोणत्या वस्तूचा त्याग केला तर त्याचे काय फळ मिळते? ते आपण आता पाहू.

चातुर्मासात गुळाचा त्याग केल्यास पुढील जन्मी तो मधुर भाषण करणारा व्यक्ती होतो.

चातुर्मासात खाद्य तेलाचा त्याग केल्यास पुढील जन्मी तो सुंदर देहाचा व्यक्ती होतो.

कडू तेलाचा त्याग केल्यास पुढील जन्मी त्याच्या शत्रूचा नाश होतो.

चातुर्मासात मोहाच्या तेलाचा त्याग केल्यास पुढील जन्मी त्याला सौभाग्याची प्राप्ती होते.

चातुर्मासात फुलांचे स्वतः साठी सेवन न केल्यास पुढील जन्मी तो विद्याधर होतो.

चातुर्मासात योगाभ्यास केल्यास ब्रह्म पद प्राप्त होते.

या काळात एखाद्याने कडू आंबट तिखट गोड खारट तुरट इत्यादी रसांचा त्याग केल्यास, तो विद्रूप होत नाही तसेच त्याची दुर्गती ही होत नाही.

विड्याचे पान खाणे सोडल्यास त्याला श्रेष्ठ भोग प्राप्त होतात व तो मधुर कंठाचा होतो.

या काळात तूप खाणे सोडल्यास तो रमणीय लावण्याचा व सर्व सिद्धींचा स्वामी होतो.

त्याने या काळात फळांचा त्याग केल्यास तो बुद्धिमान होतो व त्यास अनेक पुत्र प्राप्त होतात.

श्रावणात मठ्ठा, भाद्रपदा मध्ये दही, अश्विन महिन्यात दुधाचा त्याग केल्याने मनुष्य गोलोका ची प्राप्ती करून घेऊ शकतो.

भांड्यात शिजविलेले अन्नाचा त्याग चातुर्मासा दरम्यान केल्यास त्याला स्वर्ग सुख प्राप्त होते. जमिनीवर या काळात शयन केल्यास, तो विष्णू भक्त होतो.

एखाद्याने या काळात नखे व केस कापली नाहीत तर त्याला, दररोज गंगा स्नान केल्याचे व मौनव्रत धारण केल्यास त्याच्या आज्ञेचे कोणीही उल्लंघन करीत नाही. या काळात जमिनीवरच बसून जेवल्यास तो जमीन जूमला चा मालक होतो.

चातुर्मासात ''ओम नमो नारायणाय'' या मंत्राचा, उपवास करून, जप व विष्णू चरणांना वंदन केल्यास त्याला गोदान केल्याचे फळ मिळते.

पत्रावळीवर भोजन करणारा माणूस कुरुक्षेत्रात वास करणार्या इतके फळ त्यास प्राप्त होते.

दगडावरच भोजन करणारा प्रयाग संगमात स्नान केल्याचे फळ प्राप्त करतो.

चातुर्मासात मध्यान्यापर्यंत दररोज जल न पिणारा कधीच रोगी होत नाही.

भाद्रपद शुद्ध एकादशी

भाद्रपद महिन्यातील शुक्ल एकादशीला विष्णू मूर्तीची कुशी बदलण्याची विधी करावी या एकादशीला परिवर्तिनी एकादशी असे म्हणतात.

देव शयन का करतात?

एकदा योग निद्रेने तप करुन श्रीहरींना प्रसन्न करून घेतले, व तिने अशी विनंती केली की, आपण मलाही आपल्या अंगावर कोठेतरी स्थान द्यावे. पण लक्ष्मी द्वारा छाती, शंख, चक्र, शारंग धनुष्य याशिवाय बाहु मध्ये तलवार, गरुडा द्वारे नाभि खालील भाग, डोक्यावर मुकुट व कानात कुंडले असल्याने, ही स्थाने रिक्त नव्हती. म्हणून भगवंताने योग निद्रेला आपल्या डोळ्यात स्थान दिले.

वरील कथाही रूपकात्मक आहे. खरे पाहिले असता परमात्मा हे सतत समाधीस्थ असतात व या समाधी अवस्थेत योगनिद्रा येत असते. पण याचा अर्थ असा नाही की, या योग निद्रे दरम्यान भगवंताला काहीही कळत नाही. त्याही अवस्थेत त्यांच्या संपूर्ण क्षमते निशी ते सचेत असतात. परमात्मा सहसा व्यवहारात हस्तक्षेप करीत नाहीत.

भगवान विष्णूची ही योगनिद्रा कार्तिक शुक्ल एकादशीला संपते.

एकादशी व्रता मागील उद्देश हा आपण अंतर्मुख होऊन आपल्यातील दोष कमी करणे, आपल्यात सत्व गुणाची वृद्धी करणे व परमेश्वर चिंतनात वेळ घालविणे हा असतो. हे पर्व आता अगदी नजदीक येऊन ठेपले आहे. त्यानिमित्ताने आपणही प्रभूच्या विमल चरणावर विनम्र होऊन अभिवादन करूयात

जय जय विठोबा रखुमाई

***

# चालला नामाचा गजर

**ज्योतिर्मय साहित्य**

अवघे गरजे पंढरपूर.. चालला नामाचा गजर हे महाराष्ट्रातील विठ्ठल भक्तीचे आणि वारकरी संप्रदायाचे एक अत्यंत लोकप्रिय आणि सुप्रसिद्ध भक्तिगीत (नाट्यसंगीत) आहे. हे गीत संत गोरा कुंभार या संगीत नाटकातील असून, विठ्ठलाच्या भक्तीत तल्लीन झालेल्या वारकऱ्यांच्या वारीचे आणि पंढरीच्या उत्साहाचे अप्रतिम वर्णन यात केले आहे.या गीताचे संपूर्ण शब्द खालीलप्रमाणे आहेत.

अवघे गरजे पंढरपूर, चालला नामाचा गजर ।। ध्रु. ।।


टाळ घोष कानी येती, ध्यानी विठ्ठलाची मूर्ती, पांडुरंगी जाहलो हो, चंद्रभागा तीर,चालला नामाचा गजर ।। १ ।। इडापिडा टळुनी जाती, देहाला या लाभे मुक्ती, नामरंगी रंगलो हो, संतांचे माहेर, चालला नामाचा गजर ।। २ ।।

देव दिसे ठाई ठाई, भक्तीने भक्ता पायी,सुखालाही आला पूर, आनंदाचा पूर,चालला नामाचा गजर ।। ३ ।।

या भक्तीगीताचे गीतकार (कवी) अशोकजी परांजपे आहे.संगीतकार पं. जितेंद्र अभिषेकी.मूळ गायक- प्रकाश घांग्रेकर (तसेच शौनक अभिषेकी, स्वप्नील बांदोडकर आणि महेश काळे यांनीही हे गायले आहे)नाटक- संगीत संत गोरा कुंभार. विठ्ठल भक्तीबद्दल आपल्याला या गाण्याचा अर्थ समजून घ्यायचा आहे. अवघे गरजे पंढरपूर...अवघे गरजे अवघे गरजे पंढरपूर.

वारी आणि विठ्ठलभक्तीचा अलौकिक सोहळा'' या ओळी कानावर पडताच डोळ्यांसमोर उभी राहते ती आषाढी-कार्तिकीची विलोभनीय वारी, खांद्यावर घेतलेली भगवी पताका, कपाळावर बुक्का आणि गळ्यात तुळशीची माळ घालून पंढरीच्या वाटेने चालणारा अथांग वारकरी सागर! हे केवळ एक गाणे नाही, तर ती महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आणि शतकानुशतके चालत आलेली भक्तीची एक जिवंत परंपरा आहे.

१. वारी: समतेचे आणि आनंदाचे




महापीठ पंढरपूरची वारी. हे जगातील एक अनोखे मानवी आश्चर्य आहे. इथे ना कुणी श्रीमंत असतो, ना कुणी गरीब. जात, पात, धर्म या सगळ्या भिंती गळून पडतात आणि प्रत्येक जण एकमेकांच्या पाया पडतो.

कारण प्रत्येक वारकऱ्याला समोरच्या माणसात माउली म्हणजेच विठ्ठल दिसत असतो. टाळ घोष कानी येती, ध्यानी विठ्ठलाची मूर्ती या शब्दांप्रमाणेच लाखो भाविक देहभान विसरून चंद्रभागेच्या तीराकडे ओढले जातात.

२. विठू माउली: संतांचे माहेर पंढरपूरला संतांचे माहेर म्हटले गेले आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार यांसारख्या अनेक संतांनी विठ्ठलाला केंद्रस्थानी ठेवून भक्तीची सोपी व्याख्या समाजाला शिकवली. विठ्ठल हा देव असूनही तो राजासारखा सिंहासनावर बसत नाही, तर तो विटेवर समचरण उभा राहून आपल्या भक्तांची वाट पाहत असतो. तो देवापेक्षाही माउली (आई) म्हणून वारकऱ्यांच्या अधिक जवळचा आहे.

३. इडापिडा टळुनी जाती...

वारीच्या वाटेवर शेकडो किलोमीटर चालताना वारकऱ्यांच्या पायाला फोड येतात, उन-पावसाचा मारा सोसावा लागतो. परंतु, मुखात असणाऱ्या ''ज्ञानबा-तुकाराम'' आणि ''विठ्ठल विठ्ठल'' या नामाच्या गजरामुळे थकवा कुठे पळून जातो, हे समजतही नाही. संसारातील सर्व दुःख, विवंचना आणि इडापिडा पंढरीच्या वेशीबाहेरच सुटतात. मनात शिल्लक राहतो तो केवळ सुखाचा आणि आनंदाचा महापूर ! निष्कर्षअवघे गरजे पंढरपूर हा केवळ नादाचा गजर नाही, तर तो अंतःकरणाचा आवाज आहे. आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या युगातही वारीची ही परंपरा तरुणांना आणि संपूर्ण समाजाला माणूसकी, संयम आणि निस्सीम भक्तीची शिकवण देते. चंद्रभागेच्या




वाळवंटात एकत्र येणारा हा जनसागर हेच सिद्ध करतो की, जोपर्यंत जगात विठ्ठलाचा गजर सुरू आहे, तोपर्यंत माणुसकीचा आणि आनंदाचा हा झरा कधीही आटणार नाही.

हे गीत विठ्ठलाच्या भक्तीत लीन झालेल्या वारकऱ्यांची मनःस्थिती आणि पंढरीच्या वातावरणाचे वर्णन करते.

अवघे गरजे पंढरपूर, चालला नामाचा गजर ।।

संपूर्ण पंढरपूर नगरी विठ्ठलाच्या नामघोषाने दुमदुमून (गाजते) गेली आहे. तिथे फक्त आणि फक्त ''विठ्ठल विठ्ठल'' याच नामाचा गजर आणि नाद ऐकू येत आहे.कडवे

टाळ घोष कानी याती, ध्यानी विठ्ठलाची मूर्तीपांडुरंगी जाहलो हो, चंद्रभागा तीर, चालला नामाचा गजर ।।

कानावर सतत टाळ आणि मृदंगाचा सुंदर आवाज पडत आहे आणि मनात, डोळ्यांसमोर फक्त विठ्ठलाची ती साजिरी मूर्ती दिसत आहे. चंद्रभागेच्या तीरावर (किनाऱ्यावर) आल्यावर सर्व भक्त पांडुरंगाच्या भक्तीत इतके तल्लीन झाले आहेत की, ते स्वतःचे अस्तित्व विसरून विठ्ठलमय झाले आहेत.

इडापिडा टळुनी जाती, देहाला या लाभे मुक्तीनामरंगी रंगलो हो, संतांचे माहेर, चालला नामाचा गजर ।।

पंढरीत पाऊल ठेवताच संसारातील सर्व दुःख, संकटे आणि इडापिडा (सर्व त्रासांचे) निवारण होते. माणसाला आपल्या देहाच्या आणि मोहाच्या बंधनातून मुक्ती मिळाल्याचा आनंद होतो. पंढरपूर हे सर्व संतांचे माहेर (माहेरघर) आहे. तिथे आल्यावर आम्ही सर्व जण विठ्ठलाच्या नामाच्या रंगात पूर्णपणे रंगून गेलो आहोत.

देव दिसे ठाई ठाई, भक्तीने भक्ता पायी सुखालाही आला पूर, आनंदाचा पूर, चालला नामाचा गजर ।।

भक्तांच्या निस्सीम भक्तीमुळे आता प्रत्येकाला प्रत्येक ठिकाणी, कणाकणात देव दिसायला लागला आहे. स्वतः विठ्ठल देखील आपल्या भक्तांच्या प्रेमापोटी त्यांच्या पायाशी लीन झाला आहे. या भक्तीच्या वातावरणामुळे इथे सुखाचा आणि परम आनंदाचा महापूर आला आहे. थोडक्यात सांगायचे तर, हे गाणे पंढरीच्या वारीत मिळणारा अलौकिक आनंद आणि विठ्ठल भेटीची ओढ यांचे अतिशय देखणे वर्णन करते.

हे गीत ऐकता ऐकता आपणही नकळतपणे पंढरपूरच्या होणाऱ्या नामगजरात केव्हा सामिल होवुन जातो कळतही नाही.


# महात्म्य आषाढी एकादशीचे

**ज्योतिर्मय साहित्य**



भारतीय संस्कृतीत सण व उत्सवाना महत्वाचे स्थान आहे. या सण उत्सवातून भारतीय नागरिकांना एक प्रकारे चैतन्य व उत्साह प्राप्त होतो. सण व उत्सवात सहभागी होणारे सर्वच प्रचंड उत्साही व आनंदी असतात. असाच आषाढी महिन्यातील अत्यन्त उत्साहाचा व गावकरी, वारकरी यांना प्रचंड उत्साह ऊर्जा देणारा उत्सव म्हणजे आषाढी एकादशी उत्सव होय. या आषाढी एकादशी दिनी विठ्ठलाच्या पंढरपुरात संपूर्ण राज्यातुनच नव्हे तर देशाच्या विविध भागातून भक्त - भाविक पंढरपूरात विठ्ठलाच्या दर्शनाला येतात. पंढरपूरचा विठ्ठल म्हणजे साक्षात भगवान विष्णू चे अवतार होय. भागवान विष्णू म्हणजे भूतलावरील सर्व सजीवांचे पालनकर्ते होत. विठ्ठलाच्या

दर्शनाला राज्यातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून पायी पालख्या, वारकरी, भक्त -भाविक एक महिना आधीपासूनच निघून आषाढीच्या उत्सवात सहभागी होतात. हे सर्व भक्त भाविक विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होऊन आपल्या जीवनातील व्यथा, समस्या, अडचणी विठ्ठला समोर मांडतात व आमच्यासह विश्वातील मानव जातीच्या सुख, समृद्धी व निरोगी जीवन ठेवण्यासाठी प्रार्थना करतात.




आषाढी एकादशी दिनी पंढरपूरात देशातील भक्त भाविकांची मोठी यात्राच भरते. विठ्ठल! विठ्ठल !!म्हणत हे भक्त पंढरपूर नगरी विठ्ठल नामाने दुमदुमून टाकतात. चंद्रभागा नदीच्या वालुकामय जागेवर हे सर्व भक्त भाविक विठ्ठलाच्या चिंतनात रमून जातात. पांडुरंगाला अनाथाचा नाथ ही मानतात.

चांद्रभागा नदीच्या काठावर रमून - गमून जाणाऱ्या या वारकरी मंडळीच्या दृष्टीने आषाढी एकादशी एक अनोखा भक्तिमय सोहळा असतो. पंढरपूरात जमलेली ही वारकरी भक्त भाविक म्हणजे एक मोठा भक्त परिवाराच होय. आषाढी एकादशी म्हणजे स्नेह, आपुलकी, प्रेम, सहकार्य, आपलेपणा या सर्व बाबींचा सुरेख संगम होय.

आषाढी एकादशी म्हणजे सत्संग सोहळा होय. ज्या सोहळ्यात सुसंगत, सदविचार, सदभाव, सत संग, सद्गुणांचा मिलाप दिसून येतो तो सोहळा होय. या सत्संग सोहळ्यात सर्व जाती धर्म, पंथ व संप्रदायाचे पुरुष-महिला मोठ्या आनंदाने सहभागी होतात व हे ''विश्वची माझे घर''असे दर्शन घडवितात. ज्ञानदेवापासून वारकरी संप्रदायाला आरंभ झाला व संत तुकाराम महाराज यांनी त्यावर कळस रचला आहे. शुद्ध मनाने परमेश्वराचे नामस्मरण व चिंतन करून काया-वाचा-मन भगवंताला अर्पण करणे हेच भागवत धर्माचे सार आहे. अशा या आषाढी एकादशी दिनी स्वच्छ, निर्मळ व शुद्ध मनांची माणसे एकत्र येऊन विठ्ठलाशी एकरूप होतात व विठ्ठलाला

भरपूर पाऊस दे, रोग राई दूर कर, शांती व बंधुभाव नांदू दे, जगावरचे संकट दूर कर असे साकडे टाकून प्रार्थना करतात.

गाओ गावच्या पालख्या, वारकरी, भक्त - भाविकांचा अथांग जनसागर विठ्ठलाच्या दरबारी जमतो हा सर्वांग सुंदर मेळावा विठ्ठलाला निश्चितच मोहित करतो. विठ्ठल-पांडुरंग ही भक्तांच्या या अलोट गर्दीने

व त्यांच्यातील ओढीने भक्तांच्या ईच्छा-आकांक्षा पूर्ण करतो असे मानतात. असा हा आषाढी एकादशीचा उत्सव म्हणजे सर्वांग सुंदर सत्संग सोहळाच होय. सर्वांना आषाढी एकादशीच्या हार्दिक शुभेच्छा.

***

# ''मायबाप हेचि विठ्ठल''

**ज्योतिर्मय साहित्य**

पांडुरंगा विठ्ठला मायबापा विठ्ठला



महिन्या भरापासून संपूर्ण महाराष्ट्रात विठ्ठल नामाचा गजर आसमंती घुमतो आहे, टाळ मृदूंगाचा मधुर आवाज आनंद, शांती, सुखः, समाधान देत आहे. वारीतील प्रत्येक वारकरी आनंदून गेले आहेत. वारीचा आनंद घेत आहेत. वारीला जाण्यासाठी कितीतरी गोष्टींची पूर्तता केली आणि समाधानाने निघाले वारीला. विठ्ठलाचे मुख पाहण्यासाठी वारकऱ्यांचा जीव आतुर झालेला असतो. मनाला, जीवाला आणि श्वासाला एकच ओढ लागलेली असते ती म्हणजे विठ्ठलाला पाहणे. आणि जीवन सार्थकी करणं.

आपण आपल्या आजूबाजूला अशी कित्येक लोक पाहतो की जे पांडुरंच्या दर्शणासाठी जाण्यासाठी किती धडपड करतात. कुणी सुट्टी घेतं तर कुणी पैशाची जोड करतं. अजून असंख्य कारणं आहेत. पण, पांडुरंगाच्या दर्शनाला जाताना आपल्या घरात असलेले आपले जन्मदाते वयोवृद्ध आईवडील असतात. त्यांना सोडून वारीला जाणं म्हणजे चुकीचं नाही पण योग्य ही नाही. घरात आईवडिलांची सेवा करणारं कुणी नसेल किंवा आईवडिलांना इतर दुसरीकडे कुठे ठेऊन किंवा वृद्धाश्रमात ठेऊन जर वारीला जात असाल तर त्या पांडुरंगालाही ते मान्य नाही.

अनंत यातना, असह्य वेदना, जीवघेणा त्रास हसत सहन करुन बाळाला जन्म देणारी महान अशी आई. घरादाराची काळजी वाहणारे, घराची भिंत उभी करणारे, मुलाबाळांच्या आयुष्याची काळजी वाहणारे, मुलांच्या आयुष्यभराच्या भाकरीची व्यवस्था करणारे महान वडील. शिवाय यांच्या आपल्याकडे इतर कुणीही प्रेमाने, मायेने बघत नाहीत, आपली काळजी वाहत वा करत नाहीत, आपल्याला खाल्लं-पिलं विचारत नाहीत किंवा आपल्या पोटाच्या भुकेची चिंता करत नाहीत. इतके महान आपल्या प्रत्येकांचे आईवडील.




खरं सांगायचं तर खरा देव तो ईश्वर आपल्या मायबापातच असतो. आईवडील हेच ईश्वर. आईवडिलां शिवाय कोणताही देव वा ईश्वर सर्वश्रेष्ठ वा मोठा नाही. पण, आजकाल आईवडिलांच्या बाबतीत आजची मुलं जे कांही चुकीचे वागत आहेत. ते पाहताना डोळ्यांतील आसवं थांबतच नाहीत. इतका त्रास होतो आहे आईवडीलांना. कुठे प्रॉपर्टी साठी तर कुठे पैशासाठी तर कुठे यांच्या उतारवयात यांचं कोण करत बसणार या विचाराने आईवडिलांना नाकारलं जातं आहे. आईवडिलांना त्यांच्या उतारवयात नको नको तो मानसिक, भावनिक त्रास दिला जातो आहे. मुलांच्या या वागणुकीमुळे आईवडिलांना किती त्रास होत असेल, त्यांच्या मनाला किती वेदना पोहचत असतील याची तिळमात्र जाणीव आजच्या मुलांना नाहीच. पण तरीही आईवडील सर्व कांही मुकपणे सहन करतात. ताटात जे दिलं ते खातात आणि आपलं उतारवय पुढे ढकलत असतात. दोघेच.

आईवडिलांना दुःखावून, आईवडिलांना एकटं टाकून, त्यांची गैरसोय करुन, त्यांना मानसिक त्रास देऊन जर कोणी विठ्ठलाची वारी करत असेल वा असतील तर असं चुकीचं वागू नका. आईवडिलांचीही इच्छा असते की आपणही विठ्ठलाची वारी करावी. विठ्ठल वारीचं आईवडिलांचं स्वप्नं, ती इच्छा पूर्ण करा आणि ही सर्वस्वी जबाबदारी मुलांचीच असते वा आहे. वेळीच मुलांनी ही गोष्ट लक्षात घ्यावी. मुलं आईवडिलांना सांभाळत, आईवडीलांची मनोभावे सेवा करत, ईश्वरा आधी आईवडिलांना पूजत असतील तर त्या मुलांना त्यांच्या जीवनात कधीच कांहीच कमी पडत नाही. आईवडिलांचा आशिर्वाद सदैव मुलांच्या सोबत असतो.

ज्या आईवडिलांनी आपल्या लेकरांसाठी छत्रछाया तयार केली, लेकरांना सावली दिली, लेकरांना सुखा:ची भाकर अन समाधाच्या भाकरीचा घास दिला, ज्या आईवडिलांनी मुलांच्या सुखा:साठी स्वतःचा, स्वतःच्या आवडी निवडीचा त्याग केला, केवळ लेकरांसाठी जगत आहेत, लेकरांना हवं ते देताहेत, लेकरांच्या चेहऱ्यावर सदैव हसू असावं म्हणून आई आईवडील जीवाची मरमर करुन ते प्रत्येक सुख: लेकरांच्या पदरात टाकत आहेत. अशा आईवडिलांना दुःखवू नका. आईवडिलांची निट काळजी घ्या, आईवडिलांना त्यांच्या उतारवयात सहारा, आधार द्या, त्यांना काय हवं ते वेळोवेळी काळजीने विचारत राहा. मुलांनो आईवडील आहेत तर आपण आहोत शिवाय आईवडिलांच्या मुलांचं विश्व शून्य असतं. आईवडील आहेत म्हणून आपण आहोत. आईवडिलांचा आशिर्वाद सदैव आपल्या पाठीशी असतो म्हणून तर आपण सदैव सुखी: असतो. हे लक्षात ठेवा.

विठ्ठल भक्ती करायचीच असेल तर आईवडिलांची सेवा करा, विठ्ठलाची वारी करायचीच असेल तर आईवडिलांची काळजी करा, खरा ईश्वर पाहायचाच असेल तर आईवडिलां पाहा. आईवडिलांची काळजी घ्या आईवडिलांना जपा. यातच खरी विठ्ठलाची वारी आहे, यातच खरं विठ्ठल दर्शन आहे, यातच विठ्ठलाचा वास आहे. आणि यामुळेच विठुराया त्यांच्या भक्तांवर त्यांची कृपादृष्टी ठेवतात व त्यांना आशिर्वाद देतात. म्हणून तर म्हटलं जातं

पांडुरंगा विठ्ठला मायबापा विठ्ठला

# भक्तीच्या अनंत आकाशातील चैतन्यपर्व - आषाढी एकादशी

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय अध्यात्मपरंपरेच्या अनंत आकाशात काही तिथी केवळ कालगणनेची अक्षरे म्हणून उदयाला येत नाहीत; त्या श्रद्धेच्या चिरंतन स्मृती, साधनेच्या तेजस्वी दीपशिखा आणि आत्मोन्नतीच्या मंगल पर्वण्या बनून युगानुयुगे मानवी अंतःकरणाला प्रकाशित करीत राहतात. आषाढी एकादशी हे असेच एक दिव्य पुण्यपर्वजिथे व्रताला वैराग्याचे अधिष्ठान लाभते, नामाला नादब्रह्माचे स्वरूप प्राप्त होते, भक्तीला समतेचे विशाल आकाश मिळते आणि वारीच्या असंख्य पावलांतून परब्रह्माकडे जाणारी लोकमंगलाची वाट साकार होते.

आषाढाच्या घननीळ मेघांनी आकाशाचे प्रांगण व्यापावे, वर्षाधारांनी धरित्रीचा अभिषेक करावा, मृदंधाने दिशादिशा भारावून जाव्यात आणि त्याच वेळी महाराष्ट्राच्या भूमीतून टाळ-मृदंगाचा सात्त्विक नाद उमटत 'ज्ञानोबा-माऊली... तुकाराम!' या नामघोषाने अवघे चराचर चैतन्यमय व्हावेही केवळ ऋतुचक्रातील घटना नसते; जणू सगुणाला भेटण्यासाठी निर्गुणच भक्तांच्या रूपाने पंढरीची वाट चालू लागलेले असते!

खांद्यावर भगवी पताका, गळ्यात तुळशीमाळ, कपाळी गोपीचंदनाचा टिळा, मुखी अखंड हरिनाम आणि हृदयाच्या गाभाऱ्यात सावळ्या विठुरायाच्या दर्शनाची उत्कट आस घेऊन लाखो वारकरी जेव्हा पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतात, तेव्हा प्रत्येक पाऊल प्रार्थना होते, प्रत्येक श्वास नामस्मरण होतो, प्रत्येक दिंडी समतेचे चालते मंदिर बनते आणि प्रत्येक वारकरी जणू भक्तीच्या विराट महाकाव्यातील एक जिवंत ओवी होऊन जातो.

वारीच्या वाटेवर राजा आणि रंक यांतील अंतर विरघळते; जात-पात, उच्च-नीच, धन-दौलत आणि लौकिक प्रतिष्ठेच्या भिंती कोसळतात. येथे प्रत्येक जिवाला एकच संबोधन लाभते'माऊली!'

केवढा विलक्षण शब्द!

ज्या एका शब्दात मातृत्वाची माया आहे, बंधुत्वाचा ओलावा आहे, समतेचा संस्कार आहे आणि विश्वबंधुत्वाचे उदात्त तत्त्वज्ञान आहेतो



शब्द म्हणजे 'माऊली'.

म्हणूनच पंढरीची वारी ही केवळ भूगोलातील एका स्थानापर्यंत पोहोचण्याची यात्रा नाही. ती देहाकडून देवाकडे, अहंकाराकडून समर्पणाकडे, भेदाकडून अभेदाकडे आणि 'मी'च्या संकुचित परिघातून 'विश्वात्मका'च्या विराट अनुभूतीकडे जाणारी अंतर्मुख तीर्थयात्रा आहे.

आणि या अखंड भक्तिप्रवाहाच्या मध्यभागी उभी आहेआषाढी एकादशी!

संयमाला साधनेचे स्वरूप देणारी, उपवासाला उपासनेची उंची देणारी, नामस्मरणाला मुक्तीचा मार्ग मानणारी आणि सामान्य माणसाच्या जगण्यात परमेश्वराचे अधिष्ठान जागविणारी ही पवित्र तिथी भारतीय अध्यात्मसंस्कृतीचे एक तेजस्वी प्रतीक आहे.

या पवित्र पर्वाचे पौराणिक माहात्म्य, एकादशी व्रतामागील आध्यात्मिक आशय, चातुर्मासाची साधनापरंपरा आणि पंढरीच्या वारीतून प्रकटणारे समता, सेवा, सहिष्णुता व विश्वबंधुत्वाचे तत्त्वज्ञान समजून घेताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते

पंढरीचा विठ्ठल केवळ विटेवर उभा नाही;

तो भक्तीच्या प्रत्येक श्वासात उभा आहे.

तो केवळ मंदिराच्या गाभाऱ्यात नाही;

तो वारकऱ्याच्या थकलेल्या पावलांत आहे.

तो केवळ चंद्रभागेच्या तीरावर नाही;

तो प्रेम, करुणा आणि समतेने ओथंबलेल्या प्रत्येक निर्मळ अंतःकरणात आहे!

अशा या भक्ती, ज्ञान, वैराग्य, समता आणि आत्मसमर्पणाच्या पंचामृताने




अभिषिक्त झालेल्या आषाढी एकादशीच्या दिव्य माहात्म्याचा हा भावयात्रामय मागोवा...

भक्ती, व्रत आणि वारीचा चैतन्यमय महामहोत्सव-

आषाढाच्या मेघमल्हारी नभातून वर्षाधारा धरतीवर बरसू लागतात, मातीच्या कणाकणांतून मृद्गंधाची मंगल स्पंदने उमलू लागतात आणि महाराष्ट्राच्या भक्तिभावनेला एक अनामिक ओढ पंढरीच्या दिशेने साद घालू लागतेतेव्हा जाणवते, आषाढी एकादशीचे पुण्यपर्व समीप आले आहे!

टाळ-मृदंगाचा निनाद, मुखी अखंड हरिनामाचा गजर, खांद्यावर भगवी पताका, मस्तकी तुळशीवृंदावन आणि अंतःकरणात विठ्ठलभेटीची अनावर आस घेऊन चालणाऱ्या असंख्य वारकऱ्यांच्या पावलांनी अवघी भूमी जणू भक्तिरसाने पुलकित होते.

'ज्ञानोबा-तुकाराम' आणि 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल' या नामघोषांनी आसमंत दुमदुमतो आणि भक्ती, समता, त्याग, संयम व आत्मशुद्धीचा एक अद्वितीय लोकसोहळा आकार घेतो.

आषाढी एकादशी हा केवळ पंचांगातील एक पवित्र दिवस नाही; ती भारतीय अध्यात्मपरंपरेतील संयमाची साधना, भक्तीची आराधना, नामस्मरणाची उपासना आणि जीवाला शिवाशी जोडणारी आत्मोन्नतीची मंगल वाट आहे.

एकादशीची पौराणिक महती

एकादशी व्रताच्या उत्पत्तीविषयी एक प्राचीन पौराणिक आख्यायिका सांगितली जाते.

पूर्वी देव आणि दानव यांच्यामध्ये घनघोर युद्ध पेटले होते. कुंभदैत्याचा पुत्र मृदुमान्य याने कठोर तपश्चर्या करून भगवान शंकरांना प्रसन्न केले आणि त्यांच्याकडून वरदान प्राप्त केले. त्या वरदानाच्या सामर्थ्यामुळे तो अत्यंत प्रबळ झाला. ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्यासह देवतांनाही त्याचा सामना करणे कठीण झाले.

त्याच्या भयाने देवगण पर्वतावरील धात्री अर्थात आवळीच्या वृक्षाजवळील एका गुहेत आश्रयाला गेले. योगायोगाने तो दिवस आषाढ शुद्ध एकादशीचा होता. परिस्थितीमुळे देवांना अन्नग्रहण करता आले नाही आणि त्यांच्याकडून अनायासे उपवास घडला. पर्जन्यधारांनी त्यांना जणू निसर्गनिर्मित पवित्र स्नान घडविले.

तेव्हा देवतांच्या एकवटलेल्या दिव्य तेजातून आणि श्वासशक्तीतून एका अद्भुत स्त्रीशक्तीचा आविर्भाव झाला. त्या तेजस्विनी शक्तीने गुहेच्या प्रवेशद्वाराशी दबा धरून बसलेल्या मृदुमान्य दैत्याचा संहार केला.

ही दिव्य शक्ती म्हणजेच 'एकादशी देवी', अशी श्रद्धा प्रचलित आहे.

या कथेत एक सुंदर आध्यात्मिक संकेत दडलेला आहेजेव्हा संयम, तप, श्रद्धा आणि दैवी शक्ती एकवटतात, तेव्हा अंतर्बाह्य आसुरी प्रवृत्तींचा नाश होऊन आत्मतेजाचा उदय होतो.

म्हणूनच एकादशीचे व्रत हे केवळ अन्नत्यागाचे व्रत नसून इंद्रियसंयमातून आत्मशुद्धीकडे नेणारी साधना मानली जाते.

(क्रमशः)